

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.व.
दा. क्र. २८४४

BVBK-0402844

गां०वा.
२८४४
९।८।८३

[illegible]
[illegible]
[illegible] २८४४ दिनांक ९।८।८३
विषय गां.वा. [illegible]

# लोकात्मा तुकाराम

लेखक : राजा मंगळवेढेकर

BVBK-0402844

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य बारा रुपये

**प्रकाशक**
ल० गो० परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
३० सी खोताची वाडी
गिरगाव मुंबई ४

प्रथमावृत्ती-आक्टोबर १९८८/शके १९१०

© राजा मंगळवेढेकर
९ अशोकबन
मॉडेल कॉलनी
पुणे ४११ ०१६

**चित्रकार** एस्० के० परब

**फोटोकंपोझिंग**
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी मुंबई ४

**मुद्रक**
अशोक बागवे
सुदर्शन ऑफसेट
वडाळा उद्योग भवन
मुंबई

आदरणीय

ती. मामा — श्री. शंकरराव घोरपडे

यांना सप्रेम.



२८४४ ९।९।८१
जा. जा.

महाराष्ट्र संत-मंडळात संत तुकाराम महाराजांना एक वेगळे, विशेष स्थान आहे.


तेराव्या शतकात ज्ञानदेव-नामदेव आदी मंडळींनी भागवत-धर्माचा, वारकरी पंथाचा जो पाया घातला, त्यावर एकनाथ-रामदासांनी इमारत बांधली आणि तुकोबांनी कळस चढविला !

*ज्ञानदेवे रचिला पाया ।*
*तुका झालासे कळस ॥*

तुकोबा कसे चारचौघांसारखे वाटतात ! भावतात !

सर्वसामान्य जनलोकांच्या वाट्यात ज्या तऱ्हेचे आयुष्य बहुधा येत असते, तसेच आयुष्य तुकोबा जगले, प्रपंच फसला, धंदा बुडाला, हेटाळणी झाली, कर्जबाजारी झाले, दांभिकांनी बडवले, इंद्रायणीत अभंग बुडवले...

किती तरी त्यांनी सोसले, पण त्यांची क्षमा उदंड ! त्यांचे मन आभाळाएवढे !



*अणुरेणूहून थोकडा ।*
*तुका आभाळाएवढा ।।*

म्हणूनच मराठी मनात आणि मराठी मातीत तुकोबा गच्च रुतून बसले !

'ज्ञानोबा-तुकोबा' हा मराठी माणसाच्या भक्तीच्या वाटेवरला महामंत्रच बनला !

नाथांप्रमाणेच तुकोबांनीही लोकरंजनातून लोकशिक्षण साधले. ते लोकात्माच होते ! तुकोबांची अभंगवाणी म्हणजे तर मराठी सारस्वताचे भूषण !

*सुश्लोक वामनाचा*
*आर्या मयूरपंतांची*
*ओवी ज्ञानेशांची*
*अभंगवाणी तशीच तुकयाची !*

संतचरित्रात चमत्कार पुष्कळ, पण चमत्कारांकडे चमत्कार म्हणूनच पहावे आणि त्यांच्या परममंगल शिकवणीकडेच लक्ष वेधावे !

*— राजा मंगळवेढेकर*

## अनुक्रम


□ धन्य देहूगाव ९

□ कुळकथा १३

□ जडण घडण १९

□ वेगळा व्यवहार २४

□ जेथे जाते तेथे – २८

□ मन करा रे प्रसन्न! ३७

□ नाचूं कीर्तनाचे रंगी! ४५

□ 'रामकृष्णहरि' ५१

□ तुका म्हणे – ५७

□ मंबाजी ६६

□ उदकी राखिले कागद ७६

□ तुकोबांचा पत्रव्यवहार ८७

□ शब्दें वाटू धन – ९८

□ तुकोबा शिवबा भेट १०४

□ पैल आले हरि! ११३

# धन्य देहूगाव

*धन्य देहूगाव पुण्यभूमी ठाव।*
*तेथें नांदे देव पांडुरंग॥*
*धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे।*
*उच्चारिती वाचे नामघोष॥*
*कर कटीं उभा विश्वाचा जनिता।*
*वामांगी ते माता रखुमाई॥*
*गरूड पारी उभा जोडोनियां कर।*
*अश्वत्थ समोर उत्तरामुख॥*
*दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर।*
*शोभे गंगातीर इन्द्रायणी॥*
*लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन।*
*तेथे अधिष्ठान सिद्धेश्वर॥*
*विघ्नराज दारीं बहिरव बाहेरी।*
*हनुमंत शेजारी सहित दोघे॥*

संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांनी आपल्या राहत्या देहूचे महात्म्य एका अभंगात असे वर्णन केलेले आहे. आपल्या गावाबद्दल अशी धन्यता प्रकट करण्याइतके प्रेम आपल्या देहूवर तुकाराममहाराजांनी मोठ्या सेवाभावनेने केले होते. देहूच्या धुळीत त्यांचा देह वाढला – वावरला आणि देवरूपही झाला! देहूतल्या अणूरेणूशी, झाडाझुडपांशी, पशुपक्ष्यांशी, नदीडोंगरांशी, सगळ्यासगळ्यांशी ते एकरूप होऊन गेले होते. देहाने-मनाने आणि भक्तीमय सेवेने ते देहूमयच झाले होते!

देहूचे भाग्य थोर म्हणूनच तुकारामांसारखा संत त्या गावी जन्मला. वाढला.

'इंद्रायणी काठी देवाची आळंदी' तशीच तुकारामांची देहू ही गावकी आहे.

देहू आहे पुण्यापासून सत्तावीस-अठ्ठावीस किलोमीटर अंतरावर. इंद्रायणीच्या काठी वसलेलं देहू हे छोटंसं गाव मोठं देखणं आहे. तुकारामांनी देहूला 'क्षेत्र' मानलेलं आहे आणि इंद्रायणीला 'गंगा' म्हटलेलं आहे. गावात विठ्ठलाचं देऊळ आहे. हे देऊळ तुकारामांचा मुलगा नारायणबाबा यांनी १७२३ साली बांधलं. परंतु देवळातील विठ्ठलाची मूर्ती मात्र तुकारामांचे सातवे पूर्वज विश्वंभरबाबा यांच्या वेळेपासूनची आहे. तुकारामांनी या विठ्ठलाच्या मूर्तीविषयी 'ही आमच्या पूर्वजांची मिरास आहे' असे अभिमानाचे उद्‌गार काढलेले आहेत.

या देवळाला लागूनच 'देऊळघाट' आहे. तटाच्या आतली देवळं 'देऊळवाड्या'त आहेत.

देऊळवाड्यातच इनामदारांचा वाडा आहे. हे इनामदार म्हणजे तुकारामांचे पूर्वजच. विठ्ठल मंदिराच्या पूर्वेला राममंदिर आहे. त्याच्या मागं शिव-मंदिर आहे. त्याला लागून एक खोली आहे. त्या जागेला तुकारामांचे 'वृंदावन' म्हणतात. तिथे एका शिळेवर ते चिंतन-मनन करीत बसत. नंतर तिथं तुकारामांच्या पादुकांची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. त्यांचा मुखवटाही ठेवण्यात आलेला आहे.

हे वृंदावनदेखील नारायणबाबांनीच १७०४ साली बांधले.

देऊळवाड्यापासून जवळच तुकारामांचे जन्मस्थान आहे.

तिथं आता त्यांची पाषाणमूर्ती आहे. उत्तरेकडल्या महाद्वारासमोर तुकारामांच्या वंशजांच्या समाधीशिळा आहेत. त्यात नारायणबाबांचीही एक समाधी आहे.

देऊळघाटाजवळच इंद्रायणीचा डोह आहे. डोहात मोठमोठाले मासे आहेत. या माशांना तिथं अभय आहे. डोहापासून जवळच गोपाळपुरा नामक एक भाग आहे. तिथल्याच एका अश्वत्थ वृक्षाखाली तुकारामांचे निर्वाणस्थान आहे.

गोपाळपुऱ्यापासून काही अंतरावर दुसरा प्रसिद्ध डोह आहे. याच डोहात तुकारामांनी आपल्या अभंगांची गाथा बुडविली होती.

देहूपासून सहा-सात किलोमीटर अंतरावर भंडारा नावाचा डोंगर आहे. उत्तरेला नऊ-दहा किलोमीटर अंतरावर भामाचंद्र नावाचा डोंगर आहे. भंडाऱ्यावर प्राचीन शिव-मंदिर आहे आणि नव्याने बांधलेल्या विठ्ठलाच्या मंदिरात तुकारामांच्या पादुका आहेत. माघ शुद्ध दशमीला तुकारामांना गुरुपदेश झाला, म्हणून त्या दिवशी वारकरी-भक्त त्या ठिकाणी भजन-कीर्तन करून तो दिवस साजरा करतात.

भामाचंद्र डोंगरावर एक लेणे आहे. तिथल्याच एका घळीत विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती आहेत. तुकाराम या ठिकाणी येऊन चिंतन-मनन करीत असत.

देहू गावच्या मोरे नामक कुळात, आंबिले आडनावाच्या घराण्यात, तुकारामांचा १६०८ साली जन्म झाला. हे घराणे मराठा-कुणबी जमातीचे होते. त्यांचा पिढीजात व्यवसाय

वाण्याचा होता. या घराण्याकडे देहू गावाची महाजनकीदेखील होती.

या घराण्याचा तुकारामांपासून आठवा मूळपुरुष 'विश्वंभर' या नावाचा होता. विश्वंभराचा काळ हा इ.स. १३५० ते १४०० असा सामान्यपणे मानण्यात येतो. म्हणजेच विश्वंभर हा नामदेव-ज्ञानेश्वर आदींचा समकालीन असावा.

विश्वंभरबुवा या नावानेच ते देहूत लोकांना परिचित होते. कारण ते पंढरीच्या पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होते. वारकरी होते. पंढरीची वारी ते नित्यनियमाने करीत असत. विठ्ठलाच्या भजन-पूजनात वेळ कंठीत असत.

विश्वंभरबुवांना वृद्धापकाळामुळे पुढे पुढे पंढरीची वारी जमेनाशी झाली. चालण्याचा त्रास होऊ लागला. वारी चुकू लागल्यामुळे विश्वंभरबुवा मनात दुःखीकष्टी होऊ लागले. मनी तळमळू लागले. त्यांची ही आर्त तळमळ पंढरीच्या पांडुरंगाने जाणली. पांडुरंगाने त्यांना त्यांच्या स्वप्नात येऊन सांगितले की, "विश्वंभरा, यापुढं तुला पंढरीला येण्याचं कारण नाही. मी तुझ्याजवळ देहूतील आंबेवनातच आहे. मला तू तिथून उचलून घे म्हणजे झालं!"

स्वप्न-साक्षात्काराची ही हकीकत विश्वंभरबुवांनी देहूकरांना सांगितली. देहूतील गावकरी मंडळी जमा झाली. विठ्ठलाचा गजर करीत आंबेवनात गेली. आंबेवनात इकडे तिकडे पाहून शोध घेऊन पाहू लागली. तेव्हा एके ठिकाणी विश्वंभरबुवांना तुळशी-फुलं-बुक्का या वस्तू आढळल्या. विठ्ठलाची खूण पटली. त्यांनी त्याच ठिकाणी जमीन खोदली. तेव्हा दोन-तीन हातावरच

विठ्ठल-रखुमाईच्या सुबक-सुंदर अशा मूर्ती आढळल्या! विश्वंभरबुवांच्या आनंदाला आभाळ थिटे झाले. त्यांनी आणि जमलेल्या गावकऱ्यांनी विठू नामाचा गजर केला. मूर्ती वर काढल्या. टाळ-मृदुंगाच्या आणि नामघोषाच्या जयजयकारात विश्वंभरबुवांनी त्या मूर्ती मोठ्या थाटाने वाजत गाजत घरी आणल्या. घराजवळच एक देऊळ बांधले आणि तिथे त्या मूर्तींची स्थापना केली. विश्वंभरबुवांनी विठ्ठलाच्या सांगीप्रमाणे आपले उर्वरित आयुष्य या मूर्तीच्या भजन-पूजनातच वेचले.

\+ +

# कुळकथा

विश्वंभरबुवांच्या घराण्यातली विठ्ठलभक्तीची परंपरा पुढेही चालूच राहिली होती. त्यांच्यानंतर सातव्या पिढीत या परंपरेवर कळसाध्यायच घडला!

*'ज्ञानदेवे रचिला पाया,*
*तुका झालासे कळस!'*

मराठी संतमंडळात तुकाराममहाराजांचे स्थान अद्वितीय आहे!

तुकोबांच्या वडिलांचे नाव होते बोल्होबा आणि आईचे नाव होते कनकाई. दोघेही पंढरीच्या विठ्ठलाचे परमभक्त होते. माता-पित्यांच्याकडून भक्तीचा वारसा तुकोबांना लाभला होता.

देहू गावात बोल्होबांचा मोठा वाडा होता. गावच्या

महाजनकीचा अधिकार त्यांच्याकडेच होता. ते देहूचे महाजनच होते. त्यामुळे देहू गावातील आणि देहूच्या परिसरातील व्यापार-उदीम करणारांशी घनिष्ट संबंध होता. बोल्होबा स्वतः आपली लहानगी शेती करीत असत. सावकारीही करीत असत. शिवाय वाणसौद्याचे एक दुकानही चालवीत असत. ते एक गावातील प्रतिष्ठित सुखी व संपन्न सद्‌गृहस्थ होते. गावात त्यांना मोठा मान होता. सगळ्यांशी ते मिळून मिसळून वागत असत.

बोल्होबा आणि कनकाई या दांपत्यांना तीन मुलगेच होते. एक सावजी, दुसरा तुकाराम आणि तिसरा कान्होबा. थोरला सावजी हा बालपणापासूनच वैराग्यशील, विरक्त वृत्तीचा होता. तरुणपणातच त्याने परमार्थाचा मार्ग पत्करला होता. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे सावजीचे लग्न लवकरच झाले होते. पण त्याची बायको लहानपणीच वारली होती. त्याने आपल्या विरक्त वृत्तीनुसार दुसऱ्या लग्नाची व संसाराची भानगड नको, म्हणून घराकडेच पाठ फिरवली होती. त्यावेळी सावजी घरातून जो गेला तो गेलाच. पुन्हा काही तो घरी परत आला नाही.

बोल्होबांनी घर-प्रपंचाची जबाबदारी मग मधल्या तुकारामावर टाकली. तुकाराम त्यावेळी बारा-तेरा वर्षांचा होता. तो तरी सावजीचा भाऊच! त्याच्याही मनी विरक्तीचा वास दरवळत होताच. परंतु वडिलांचे उतार वय लक्षात घेऊन तुकारामाने काही काळ आपल्या विरक्तीला लगाम घातला आणि व्यवसायात स्वतःला गुंतवून घेतले.

धाकटा कान्होबा अजून लहान होता. म्हणूनही तुकारामाने ही जबाबदारी स्वीकारली होती. कशीबशी चार-सहा वर्षे त्यांनी

घर-संसाराची उसाबरी केली.

दरम्यान बोल्होबा आणि कनकाई या दोघांनीही या जगाचा निरोप घेतला.

मग तर सगळीच जबाबदारी तुकारामावर आली.

घरातला माता-पित्यांचा आधार नाहीसा झाला होता. त्या सुमारास निसर्गानेही अवकृपा केली होती. सगळीकडं दुष्काळ पडला होता. दुष्काळात शेतीभाती पार बुडाली होती. अन्नाच्या कणासाठी लोक गाव सोडून दाही दिशांना वणवण भटकत होते. झाडपाल्यावर जीव जगवीत होते. गुरेढोरे तर मृत्युमुखीच पडत होती.

या भयंकर दुष्काळाची झळ तुकारामाच्या परिवाराला लागल्याशिवाय राहिली नाही. व्यापार-धंद्यातील येणे बुडाले आणि देणे मात्र डोक्यावर तसेच राहिले.

तुकारामाची दोन लग्ने झाली होती. पहिल्या बायकोचे नाव होते रखमाबाई, पण ती होती दमेकरी. म्हणून बोल्होबांनीच तुकारामाचे दुसरे लग्न करून दिले होते. हे दोन्हीही विवाह त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे लहानपणीच झालेले होते. तुकारामाची दुसरी बायको पुण्यामधील अप्पाजी गुळवे यांची कन्या होती. तिचे माहेरचे नाव होते आवली आणि सासरचे होते जिजाबाई.

तुकोबांना आठ पिढ्यांचा विठ्ठलभक्तीचा वारसा मिळालेला होता. त्यांच्या वृत्तीत व रक्तात ती होतीच. पण ती उसळून प्रकट व्हायला तो दुष्काळ कारणीभूत ठरला. आईवडिलांच्या माघारी दुष्काळात तुकोबांची पहिली बायको उपासमारीला बळी पडली. तिच्यापासून झालेला मुलगाही मरण पावला. व्यापारधंदा तर पार

बसलाच होता. संसार चालवणं महाकठीण झालं होतं. कर्जपाणी वाढलं होतं. सावकारी तगादे मागं लागले होते. संसाराविषयी मुळात आसक्ती नसलेल्या तुकोबांना संसाराचे हे क्लेश सहन करावे लागले. प्रपंच-दुःखाने ते गांजून गेले तेव्हा जिजाबाईनं आपल्या माहेराहून काही मदत आणली. जिजाबाईचे माहेर तसे सधन होते. त्या भांडवलावर तुकोबांनी धंदा पुनःश्च सुरू केला. ते आता बैलावर माल लादून गावोगाव फिरू लागले. पण त्यात त्यांना यश लाभले नाही. विस्कटलेली धंद्याची घडी पुन्हा बसलीच नाही. शेवटी तर त्यांना दिवाळेच काढावे लागले. सावकारांनी होते नव्हते ते हिरावून नेले. तुकोबांच्या संसाराची अशी दुर्दशा झाली.

अशा अवस्थेत त्यांनी मग त्यांच्या विठ्ठलाकडे धाव घेतली. प्रपंचाकडे पाठ फिरवली. प्रपंचाचा भार त्यांनी विठ्ठलाकडेच सोपवून दिला. या हलाखीतून एका विठ्ठलाशिवाय आता कोणीही वाचवू शकणार नाही अशी त्यांची खात्री पटली. इतके दिवस दाबून ठेवलेली वैराग्याची ऊर्मी उफाळून आली. तुकोबांची वाट मोकळी झाली. आता या वाटेवर ते आणि त्यांचा पांडुरंग असे दोघेच उरले होते. आणि म्हणून त्यांनी देवाला सांगून टाकले होते, 'अरे आता तुझे आणि माझेच राज्य आहे! या राज्यात दुसऱ्याचं काय काम? वडील, आई, बायको, मुलगा यांना तू नेलेस आणि मला मायेतून सोडविलेस. धंद्यातही तू माझे दिवाळे काढलेस, दुष्काळात दैना केलीस, दुसरी बायको कजाग दिलीस, तिनं जनलोकात अपमानीत केलं. गुरं, ढोरं आणि लोक-लज्जासुद्धा गेली. मग आता तुझ्याशिवाय मला कोण आहे?

म्हणून तुझे पाय आठवून शरण आलो आहे. अरे, या संसाराच्या तापाने मी फार फार नागवला गेलो आहे. कासावीस झालो आहे म्हणून तू आता तुझ्या ब्रीदाला जाग आणि माझ्यासारख्या दिनावर कृपेची पाखर घालण्यासाठी धावत ये!'

तुकोबांनी ही सगळी दिनवाणी स्थिती आपल्या अभंगातून पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केली आहे :

*बाप मेला न कळतां।*
*नव्हती संसाराची चिंता॥*
*विठो, तुझे माझें राज्य।*
*नाही दुसऱ्याचें काज॥*
*बाइल मेली मुक्त झाली।*
*देवे माया सोडविली॥*
*पोर मेले बरें झालें।*
*देवे मायेविरहित केलें॥*
*माता मेली मज देखतां।*
*तुका म्हणे हरलों चिंता॥*

*बरें झालें देवा निघालें दिवाळें।*
*बरी या दुष्काळें पीडा केली॥*
*अनुतापें तुझें राहिलें चिंतन।*
*जाला हा वमन संवसार॥*
*बरें झालें देवा बाईल कर्कशा।*
*बरी हे दुर्दशा जनामध्यें॥*
*बरें झालें जगीं पावलों अपमान।*

*बरें गेलें धन ढोरें गुरें ||*
*बरें झालें नाहीं धरिली लोकलाज |*
*बरा आलों तुज शरण देवा ||*

*संसाराच्या तापें तापलों मी देवा |*
*करितां या सेवा कुटंबाची ||*
*म्हणऊनी तुझे आठवले पाये |*
*ये वो माझे माये पांडुरंगे ||*
*बहुतां जन्मींचा जालों भारवाही |*
*सुटिजे हें नाही वर्म ठावें ||*
*वाढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं |*
*कणव न करी कोणी माझी ||*
*बहु पांगविलों बहु नागविलों |*
*बहुदीस जालों कासावीस ||*
*तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं |*
*ब्रीद तुझें जगी दीननाक्षा ||*

तुकोबा यावेळी वीशी-पंचविशीतच होते. तारुण्यातच होते. दुःखाच्या विराट दर्शनामुळे मायेचे स्वरूप त्यांना नीट आकलन झाले होते. त्यातूनच त्यांच्या वृत्तीला अलिप्तपणाची सहज स्थिती प्राप्त झाली होती. त्यांनी धरलेल्या भक्तीच्या वाटेला ती उपकारकच ठरलेली होती.

# जडण-घडण

पंचविशीत तुकोबांना लाभलेली चित्ताची ही निर्लेप स्थिती त्यांच्या ठायीच्या आधीच्या संस्कारांमुळेच प्राप्त झालेली होती. आई-वडील दोघेही श्रद्धाळू आणि भक्तहृदयी होते. थोरला भाऊ हा तर उदासीन-विरक्तच होता. घरातल्या भक्ती आणि वैराग्य या सद्गुणांचा प्रभाव बालपणातच लहानग्या तुकयावर झाल्याशिवाय राहिला नाही. व्यापार-उदीमातही वडिलांचा व्यवहार निर्मळ आणि चोख होता. तिथं कसलीही लांडीलबाडी नव्हती. त्यांचं वागणं सगळ्यांशी सोज्वळ व आनंददायक होतं. बोलणं मृदु-मवाळ होतं. त्यांच्या या नैतिक वर्तनाची चांगली छाप तुकयाच्या मनावर दृढ झाल्याशिवाय राहिली नव्हती. हे उत्तम शिक्षण तुकयाला घरच्या शाळेत सहज मिळाले होते. त्यामुळंच त्याचं स्वतःचं आचरणही पुढं तसंच शुद्ध आणि निर्मळ झालं. आपल्या या अनुभवातूनच तुकोबांनी एका अभंगात म्हटले आहे :

*जोडोनिया धन उत्तम व्यवहारें।*
*उदास विचारें वेंच करी॥*
*उत्तमचि गती तो एक पावेल।*
*उत्तम भोगील जीव खाणी॥*
*पर उपकारी नेणें परनिंदा।*
*परस्त्रिया सदा बहिणी माता॥*
*भूतदया गाई पशूंचे पालन।*

*तान्हेल्या जीवन वनामाजी ॥*

तुकोबांचं बालपण घरची समृद्धी असल्यामुळं आनंदात गेलं होतं. सवंगड्यांबरोबर हसण्यात-खेळण्यात-बागडण्यात गेलं होतं. देहू हे लहानसं खेडेगाव. आजूबाजूला शेतकऱ्यांचीच मुलं. शेतीभाती आणि गुरंढोरं हाच प्रमुख व्यवसाय. त्या मुलांबरोबर शेतमळ्यांतून हिंडावं. झाडाझुडुपातून आणि उभ्या पिकातून फिरावं. पशुपक्ष्यांशी मैत्री करावी, गाईगुरात मिसळावं, नदीनाल्यात डुंबावं, हुमण दांडग्यांशी मस्तीही करावी, लगोऱ्या, हुतूतू, चेंडूफळी, विटीदांडू, सूरपारंब्या इत्यादी खेळ खेळावेत आणि मोकळ्या हवेत भरपूर व्यायाम करावा असे त्यांचे रम्य बालपण होते.

आपल्या बालपणातल्या या खेळण्या-बागडण्याचे वर्णन काही अभंगांतून त्यांनी फारच बहारीने केले आहे :

*बाळपणी ऐसीं वरुषे गेली बारा।*
*खेळतां या पोरां नाना मते ॥*
*विटीदांडू, चेंडू, लगोऱ्या, वाघोडी।*
*चंपे, पेंड, खडी, एकी बेकी ॥*
*हमामा, हुंबरी, पकव्याचे बारे।*
*खेळे जंगी, भोंवरे, चुंबाचुंबी ॥*
*सेलडेरा आणि निसर भोवंडी।*
*उचले बोले धोंडी अंगबळें ॥*

दुसऱ्या एका अभंगात श्रीकृष्णाच्या बालपणाच्या निमित्ताने ते लिहितात :

*चला वळूं गाई।*
*दूर अंतरल्या भाई॥*
*खेळ खेळतां जाणा शीण।*
*कोण करी वणवण॥*
*गाई हकारी कान्हया।*
*म्हणोनि लागती ते पायां॥*
*तुका म्हणे द्यावें।*
*नाम संकीर्तन बरवें॥*

या त्यांच्या खेळण्या-बागडण्यानं त्यांची शरीरप्रकृती सुदृढ तर झालीच, पण निसर्गाच्या उघड्या शाळेत पुष्कळसे शिकायलाही मिळाले. निसर्गाच्या कुशीतच ते लहानाचे मोठे झाले. आणि म्हणूनच पुढील आयुष्यात त्यांनी लिहिलेल्या एका अभंगात आपला हा अनुभव त्यांनी आप्तभावनेनं व्यक्त केलेला आहे. भोवतालची वनश्री आणि पशुपक्षी त्यांना आपल्या गोतावळ्यासारखीच प्रिय झाली होती. माणसाचा गोतावळा मोठा व्यापक असतो: तो घरातल्या नात्यागोत्यापुरताच केवळ मर्यादित नसतो, तर अंगणापरसातल्या आणि रानावनातल्या झाडाझुडुपांशीही संबंधीत असतो. तुकारामांनी अशा व्यापक दृष्टीनेच या सजीव सृष्टीकडे पाहिले आणि सृष्टीतील प्रेम अनुभवले. सृष्टीकडे प्रेमभावनेनेच पाहिले. तुकाराम म्हणतात :

*वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरें।*
*पक्षी ही सुस्वरें आळविती॥*
*येणें सुखें रूचे एकांताचा वास।*

*नाही गुण दोष अंगा येत॥*
*आकाश मंडप पृथिवी आसन।*
*रमे तेथें मन क्रीडा करी॥*
*कंथाकुमंडल देहउपचारा।*
*जाणवितो वारा अवसरू॥*
*हरिकथा भोजन परवडी विस्तार।*
*करोनि प्रकार सेवूं रूची*
*तुका म्हणे होय मनासी संवाद।*
*आपुला चि वाद आपणांसी॥*

आपल्या सोयऱ्याधायऱ्यांच्या बरोबरच तुकोबांनी आपल्या भक्तहृदयाची स्थिती निवेदन केलेली आहे.

निसर्गाच्या कुशीत खेळत, वाढत, शिकत असतानाच घरात, देवळात किंवा असेच कुठे कुठे कानावर काही काही चांगले चांगले पडत होते. त्यात ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी होती. हरिपाठ होता. नामदेवांचे अभंग होते. कबिराचे दोहे होते. एकनाथांचे भागवत होते. गावात कथा-कीर्तनं होत असत. घरातल्या देवळातही भजनाचा फड रंगत असे. कोवळ्या वयातला तुकया आवडीनं सगळं ऐकत असे. त्याची बुद्धीही चांगली होती. स्मरणही उत्तम होते. त्यामुळे ऐकता ऐकताच कितीतरी ओव्या, कितीतरी अभंग, कितीतरी दोहे, कितीतरी श्लोक, गवळणी, भारूडे, आरत्या-भूपाळ्या तोंडपाठ होऊन गेल्या. त्यामुळे त्या उठता बसता मुखातूनही उमटू लागल्या. त्यातून एक निराळीच गोडी उत्पन्न झाली. कथा-कीर्तनात हरिदास-पुराणिक अधात्म विचाराचे, तत्त्वज्ञानाचे, दर्शनांचे सुलभ सोप्या भाषेत विवरण

करीत असत. पुराणातल्या गोष्टीही रंगवून सांगत असत. वेदांताची आणि कुराणांची ओळख न कळतच होऊन गेली. ती इतकी की पुढील आयुष्यात तुकारामांनी मोठ्या आत्मविश्वासाने "वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां॥" असे सार्थ उद्गार काढले आहेत. केवळ वेद घोकल्याने किंवा शास्त्रपठणाने त्यातील आशय कळतोच असे नाही, तर तो कळण्याची आणि त्यानुसार आचरण करण्याची हिंमत तुकारामांच्यासारख्या संताजवळच असते. म्हणूनच पढिक पंडितांना त्यांनी असे फटकारलेले आहे.

ह्या सगळ्या ऐकण्या-पाहण्याने तरुण तुकयाच्या ठिकाणी फार मोठा बहुश्रुतपणा आलेला होता. विषयाच्या अंतरंगाचा वेध घेण्याचे सामर्थ्यही आलेले होते. जीवनाकडे पाहण्याची सर्वस्पर्शी दृष्टीही लाभलेली होती. हे शिक्षण शाळेशिवायच तुकारामांचे झालेले होते.

जुन्या काळी आजच्यासारख्या शाळा नव्हत्याच. एखादा पंतोजी मुलांना शिकवीत असे. ती मुलं बहुधा तथाकथित उच्च वर्गातलीच असत. लहानग्या वयातच तुकयाला लिहिण्या-वाचण्यापुरती अक्षर-ओळख झालेली होती. घरात दुकानदारी होती. त्यामुळे कामापुरते हिशेब-गणित येत होते. शालेय शिक्षण म्हटले तर ते एवढेच झालेले होते. बाकी जीवनाच्या शाळेतच ते पुष्कळसे शिकले होते.

+ +

# वेगळा व्यवहार

दुष्काळ आणि संसाराची झालेली दुर्दशा यातूनही तुकारामांच्या गाठी बरंच शहाणपण जमा झालेलं होतं. त्यांचं हे शहाणपण इतर व्यवहारी शहाण्यांपेक्षा वेगळ्या प्रकारचं होतं. इतर शहाणे ठेच खाऊन शहाणे होतात. सावध राहतात. आणि बघता बघता तेच मोठे चलाख होऊन मिरवतात. पैशाला पैसा जोडतात आणि चांगले गबर होतात. पण तुकारामांचा व्यवहार हा वेगळाच होता.

एकदा जिजाबाईंनी काहीतरी खटपट करून मिठाच्या गोण्या मिळवल्या. त्या बैलाच्या पाठीवर लादल्या आणि तुकारामाला मीठ विकण्यासाठी घाटावर पाठविले. तुकारामांनी गावोगाव हिंडून मीठ विकलं. सगळा माल संपला. कमाई बरी झाली. पैशाचा कसा कमरेला बांधून ते देहूकडे निघाले. वाटेत एका रात्री एका गावातल्या देवळात मुक्कामाला राहिले. देवळात रात्री फडकरी जमा झाले आणि टाळ-मृदुंगाच्या तालात भजन रंगले. त्या भजनात तुकोबाही गुंगून गेले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे सुंदर रूपडे त्यांच्या डोळ्यांपुढे दिसू लागले. तुकोबाच्या तोंडून अभंगवाणी उमटली :

*सुंदर ते ध्यान उभें विटेवरी।*
*कर कटावरी ठेवूनियां॥*
*तुलसीहार गळां कासे पीतांबर।*
*आवडे निरंतर तें चि रूप॥*

*मकरकुंडले तळपती श्रवणीं।*
*कंठी कौस्तुभमणि विराजित॥*
*तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख।*
*पाहीन श्रीमुख आवडीनें॥*

तुकोबा भजनात रंगून गेले. विठ्ठलाच्या गुणसंकीर्तनात भान विसरून गेले. सकाळ तिथंच उजाडली. तशी एक माणूस त्यांच्याजवळ आला आणि त्यांचे पाय धरून म्हणू लागला, "तुम्ही भले दिसतां मी संकटात आहे मला मदत करा."

तुकोबांनी त्यांना विचारले, "काय करू, कसलं संकट आलं तुमच्यावर?"

त्या माणसाने सांगितलं, "सावकाराकडं माझी जमीन कर्जासाठी गहाण ठेवली होती. त्यातले काही पैसे त्याला लागलीच द्यायचे आहेत. नाहीतर तो माझी जमीन बळकावणार आहे. जमीन गेली तर माझ्या आणि मुलाबाळांच्या तोंडचा घासच जाईल."

"असं! काळजी करू नकोस. हे घे पैसे. सावकाराला नेऊन दे." तुकोबांनी त्याच्यापुढे कसा रिकामा केला.

तो माणूस गेल्यावर तुकोबा तिथून निघाले. घरी आले. मिठाच्या गोण्या दिसल्या नाहीत, म्हणजे त्या विकल्या गेल्या, हे जिजाबाईंनी ताडले. तरी पण तुकोबांना विचारलं,

"धंदा कसा झाला?"

तुकोबांनी सांगितले, "उत्तम झाला."

"सगळा माल विकला नव्हं?"

"होय. सगळा विकला."

"मग द्या पैसे. घरात काही नाही. बाजारातून काहीतरी आणते."

"पैसे! पैसे नाहीत."

"मग कुठं गेले?"

"अग, ज्यानं दिले त्यानंच नेले."

"असं कोड्यात बोलू नका. नीट सांगा. चोराठोरांनी नेले का?" जिजाबाईनं रागानंच विचारलं.

"आवले, अग विठ्ठलाला तू चोर म्हणतेस?" तुकोबांनी हसत शांतपणानं म्हटलं.

"म्हणजे तिथंही तुमचा त्यो विठोबा आलाच होता का? घरात खाऊ देईना. बाजारातही राहू देईना."

मग तुकोबांनी सगळी हकीकत जिजाबाईला सांगितली. ती ऐकून कपाळाला हात लावीत ती म्हणाली, "अरे देवा! घरात आपली पोरं उपाशी ठेवून दुसऱ्याची पोरं जेवू घालायला गेला होतात व्हय."

असा प्रकार तुकोबाच्या संसारात नेहमीच घडू लागला होता. तुकोबांच्या ठिकाणचा आपपरभाव केव्हाच मावळला होता.

एकदा एकानं तुकारामांना आपलं शेत राखायला ठेवलं होतं. शेताच्या मालकानं एकदा संध्याकाळी परत जाताना तुकोबाला एक उसाची मुळी दिली होती. खांद्यावर मुळी टाकून तुकोबा घरी यायला निघाले. वाटेत गावातल्या मुलांनी ते पाहिले. उसासाठी मुलं त्यांच्याभोवती जमा झाली. तुकोबांनी त्या सगळ्या मुलांना एक एक ऊस देऊन टाकला. घरी येईपर्यंत घरच्या काशीकरिता आणि महादाकरिता कसाबसा एकच ऊस उरला होता.

यावेळीही जिजाबाईनं त्यांना पुष्कळ बोलून घेतलं. पण तुकोबा आपले पोरांच्या आनंदानं आनंदून गेले होते!

आणखी एकदा असेच झाले. तुकोबा एका गावाला धंद्यासाठी गेले. परत येताना वाटेतच त्यांना एक गरीब ब्राह्मण भेटला. तो म्हणाला, "माझा मुलगा मुंजीचा झाला आहे. त्याची मुंज करायची आहे. माझ्याजवळ तर फुटकी कवडीदेखील नाही. मी काळजीत पडलो आहे."

जवळचे पैसे त्याच्या हाती देत तुकोबा म्हणाले, "हे घ्या पैसे. माझ्याजवळ येवढेच आहेत. काळजी करू नका. मुलाची मुंज करा."

रिकाम्या हातानं तुकोबा तिथून निघाले. पण त्या दिवशी देहूला घरी काही गेले नाहीत. भामचंद्राच्या डोंगरात जाऊन बसले. तिथं त्यांचा विठोबा होताच.

इकडं तुकोबांनी एका ब्राह्मणाला पैसे दिल्याची वार्ता जिजाबाईच्या कानी आली होती. ती संतापानं पेटून गेली होती. आता दादला घरी आला की, ती त्याच्यावर सगळा राग काढणार होती. बोलून बोलून घेणार होती. ती त्यांच्या वाटेकडं डोळे लावून बसली होती. पण दुसरा दिवस टळला, तरी तुकोबा काही घरी आलेच नाहीत. घरी गेल्यावर काय घडणार हे त्यांनाही आता अनुभवानं ठाऊक झाल्यामुळं त्यांनी डोंगराची वाट धरली होती.

दोन दिवस असेच गेले आणि मग मात्र जिजाबाईचा जीव काळजीत पडला. तुकोबा घरी आले नाहीत मग कुठं गेले असतील? कुठं राहिले असतील? कुठं जेवले असतील?

जिजाबाई गोंधळून गेली. काळजीनं व्याकूळ झाली. तुकोबावर ती रागवायची, संतापायची, आदळआपट करायची, नाही नाही ते बोलून घ्यायची. पण तिचा जीवही तुकारामावर फार फार होता. तिच्या प्रेमाची तऱ्हाच वेगळी होती. ती सरळ सरळ प्रपंच करणारी, व्यवहारी बाई होती. पोराबाळात आणि गाडग्यामडक्यात तिचा जीव गुंतलेला होता. त्यापलिकडं एका तुकोबाशिवाय तिला दुसरा देव नव्हता.

पण तुकोबाचं तिच्याहून सगळंच वेगळं होतं. अवघाची संसार सुखाचा करायला ते निघालेले होते. सगळे विश्वच त्यांचे घर बनले होते. एका पांडुरंगाशिवाय त्यांना दुसरं काहीच सुचत नव्हतं. कारण तोच त्यांचा सखा, सोबती, वाटाड्या सगळं काही होता.

तुकोबा घरी परतले नाहीत. जिजाबाई घाबरून गेली. रडू लागली. तुकोबाच्या वाटेकडं डोळे लावून बसली.

++

# जेथे जातो तेथे –

भामचंद्राच्या डोंगराला भामनाथ असंही म्हटलं जात असे. तिथल्या एका गुहेत महादेवाची पिंड होती. झुळझुळ वाहतं पाणी आणि हिरवीगार झाडी असं ते रमणीय ठिकाण होतं. तुकोबांनी या सग्यासोयऱ्यांच्या सान्निध्यात महादेवाच्या पुढं ठाण मांडलं. अनन्यभावानं शरण गेले. म्हणाले, "महादेवा तुम्ही विश्वाचे

नाथ आहात. निर्माते आणि पालनकर्ते आहात. मी दीन-अनाथ आहे. तुमच्या पायाशी आलो आहे. माझ्यावर कृपेची पाखर घालावी. तुमच्याजवळ कशाचे उणे आहे. मला आपले प्रेम लाभावे एवढीच विनवणी आहे. यातच मी समाधानी होईन.''

*तुम्ही विश्वनाथ। दीन रंक मी अनाथ॥*
*कृपा कराल ते थोडी। पायां पडलो बराडी॥*
*काय उणें तुम्हां पाशी। मी तो अल्पची संतोशी॥*
*तुका म्हणे देवा। प्रेम भातुके पाठवा॥*

तुकोबांनी असं मागणं मागून तिथंच देवापुढं धरणं धरलं. विठ्ठलाच्या नामाचा गजर सुरू ठेवला. आता त्याची भेट झाल्याशिवाय इथून हालायचे नाही असा निर्धार मनाशी केला. 'तुटो हे शरीर, तुटो हे मस्तक। नामाचा गजर सोडू नये॥ अशा निर्धाराने ते तिथेच राहिले. दिवस उगवला-मावळला. रात्र आली-गेली. या कशाचे भान त्यांना उरले नाही. तहानभूक तर ते केव्हाच विसरले होते. त्या एकांतात देवाचाच ध्यास त्यांनी घेतलेला होता.

बघता बघता असे दिवसामागून दिवस गेले. या अवधीत विंचू, साप, वाघ असे विषारी आणि हिंस्त्र प्राणी त्यांच्याजवळ आले आणि गेले. तुकोबांना कशाचीच शुद्ध नव्हती. कोणाचीच भीती नव्हती. ते आपल्या समाधीतच दंग होते.

दोन आठवडे संपले. पंधराव्या दिवशी सकाळी तुकोबांनी डोळे उघडून पाहिले. अवघी गुहा विलक्षण दिव्य प्रकाशानं उजळून गेली होती. सगळीकडं उजेडच उजेड पसरलेला होता.

केवळ गुहेतच नव्हे तर तुकोबांच्या अंतरातही विलक्षण उजाडले होते. प्रकाशले होते. लखलखून गेले होते. हा दिव्य तेजाचा साक्षात्कारच त्यांना घडला होता. पांडुरंगाची प्रकाशमूर्तीच त्यांना दिसली होती. या स्थितीचे वर्णन तुकोबांनीच एका अभंगात केले आहे :

*पंधरा दिवसांमाजी झाला साक्षात्कार।*
*विठोबा भेटला निराकार॥*
*भामगिरी पाठारी वसती जाण केली।*
*वृत्ती स्थिरावली परब्रह्मीं॥*
*सर्व विंचू व्याघ्र अंगासी झोंबले।*
*पीडू ते लागले सकळिक॥*
*निर्वाण जाणोनी घातलें आसन।*
*आरंभिले ध्यान देवाजीचें॥*

या आगळ्या वेगळ्या साक्षात्काराने तुकोबांना नव्या जागृतीची जाग आली. त्यांना कळून आलं की, देव आपणापासून काही लांब नाही. तो आपल्यातच आहे. आपल्याजवळच आहे. आपल्या बरोबरच आहे. आपला हात धरून चालवत आहे. त्याच्या आधारानच आपण चालत आहोत. आपला सगळा भार तोच वाहतो आहे. आपला वेडावाकडा शब्द तोच सरळ करून घेत आहे. त्यानंच माझी लाज घालवून मला धीट बनवलं आहे. आता सगळे लोक मला माझ्या सोयऱ्यासारखेच प्राणप्रिय झालेले आहेत. ह्या सुखाच्या सोहळ्यात मी अंतर्बाह्य डुंबतो आहे. कौतुकानं खेळतो आहे.

बागडतो आहे :

*जेथे जातों तेथें तूं माझा सांगाती।*
*चालवीसी हातीं धरोनियां॥*
*चालों जातां आम्हा तुझाचि आधार।*
*चालविसी भार सर्व माझा॥*
*बोलों जाता बरळ करिसी तें नीट।*
*नेली लाज धीट केलों देवा॥*
*अवघे जन मज झाले लोकपाळ।*
*सोइरे सकळ प्राणसखे॥*
*तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें।*
*झालें तुझें सुख अन्तर्बाह्य॥*

तुकोबाची ही स्थिती अशी आनंदमय होती, तर तिकडं घरी जिजाबाई काळजीत आणि दुःखात बुडून गेली होती. पंधरा दिवस झाले. तुकोबाचा पत्ता नव्हता. ती वेडीपिसी बनली होती. ती स्वतःलाच बोल लावून घेत होती, "उगाच मी त्यांना बोलले. छळले. ते माझ्यावर रागावून तर गेले नसतील. आता मी करू तरी काय? कुठं जाऊ? कुठं पाहू. . . ?"

जिजाबाई दारात उभी राहायची. आल्या-गेलेल्याला विचारायची, "आमच्या ह्यांना पाहिलंत का हो कुठं?"

"आमचे हे तुम्हाला दिसले का हो कुठं?"

पण तुकोबाचा पत्ता कुणीच सांगितला नाही. कारण त्यांना कुणीच पाहिलं नव्हतं. बघितलं नव्हतं.

जिजाबाईनं अन्नपाणी वर्ज्य केलं. रडून रडून तिचे डोळे

सुजले. धाकटा दीर कान्होबा म्हणाला, ''वहिनी, असं वाईट वाटून कशाला घेतेस? दादाचं काही बरंवाईट झालेलं नसणार. त्याचं लक्ष आता संसारात उरलेलं नाही. तो कुठंतरी देवाच्या मार्गातच असणार. मी जाऊ का शोधायला?''

जिजाबाई उताविळीने म्हणाल्या, ''भाऊजी, जा. त्यांना हुडकून आणा. फार उपकार होतील तुमचे. माझ्या देहाच्या कातडीचे जोडे करून घालीन तुम्हाला. जा भाऊजी.''

कान्होबा घराबाहेर पडला. तुकोबा जिथं जिथं जात असत, बसत असत, तिथं तिथं तो गेला. चौकशी केली. सगळी ठिकाणं धुंडाळली. गावात कुठे ठावठिकाणा लागला नाही. म्हणून तो भंडाऱ्याच्या डोंगरावर गेला. दादा तिथं कधी कधी जाऊन बसायचा हे त्याला ठाऊक होतं. त्यानं भंडाऱ्याचा डोंगर पालथा घातला. तिथलं विठोबाचं देऊळ बघितलं. दादा कुठंच दिसला नाही. मनात हिरमुसून गेला. जड पावलानं डोंगर उतरू लागला. तर तिकडून एक मोळीवाला त्याला दिसला. कान्होबानं त्याला विचारलं, ''आमचा दादा दिसला का हो कुठं?''

मोळीवाला म्हणाला, ''म्हणजे तुकोबा व्हय, दिसलं की!''

''कुठं-कुठं आहेत ते?''

''भामनाथाच्या गुहेत बसलेत भजन करीत. आनंदात आहेत.''

कान्होबानं तडक भामनाथच्या डोंगराची वाट धरली. कान्होबा न थांबता, न विसावता भामनाथाचा डोंगर चढला. इकडं तिकडं फिरून शोध घेऊ लागला. एका घळीत गुहा दिसली. तिकडं वळला. गुहेच्या जवळ जाताच तुकोबाचे शब्द

कानावर आले :

*सर्व-भावें आलों तुजची शरण।*
*काया-वाचा-मनासहित देवा।।*
*आणीक दुसरें न ये माझे मना।*
*राहीली वासना तुझे ठायीं।।*
*माझीयेबरीचें कांही जड-भारी।*
*तुजवीण वारी कोण देवा।।*
*तुझे आम्ही दास आमचा तूं धनी।*
*चालत दुरूनी आलों मागें।।*
*तुका म्हणे आता घेतलें धरणें।*
*हिशोबाकारणें भेटी देई।।*

हा दादाचा आवाज आणि हा दादाचा अभंग हे कान्होबानं चटकन ओळखलं. दादाचा ठावठिकाणा लागला याचा अतीव आनंद त्याला झाला. कान्होबाने पुढं होऊन हाक दिली, ''दादाऽऽऽऽ''

तुकोबांनी डोळे उघडले आणि ''कोण आहे?'' म्हणून विचारलं.

कान्होबा पटकन पुढं गेला आणि त्यानं दादांचे पाय धरले. म्हणाला, ''मी कान्होबा आलोय, दादा!''

त्याच्या पाठीदर प्रेमानं हात फिरवीत तुकोबांनी म्हटलं, ''कान्होबा, कसा रे आलास इथं?''

''दादा, पंधरा दिवस झाले, तुमचा पत्ता नाही. वाट बघून बघून आम्ही थकलो. काळजीत पडलो. मग चौकशी करत करत

इथं येऊन पोचलो. दादा, पंधरा दिवस इथंच आहात तुम्ही?''

''पंधरा दिवस झाले! कान्होबा, मला तर काहीच आठवत नाही.''

''दादा, अशा गुहेत राहिलात, साप, विंचवाचं आणि वाघाचं भय नाही वाटलं?''

तुकोबा नंतर हसले आणि म्हणाले,

*चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती।*
*व्याघ्र हे न खाती सर्प तया॥*
*विष तें अमृत आघात तें हित।*
*अकर्तव्य नीत होय त्यासी॥*
*दुःख तें देईल सर्व सुख फळ।*
*होतील शीतळ अग्निज्वाळा॥*
*आवडेल जीवां जीवाचिये परी।*
*सकळां अंतरी एक भाव॥*
*तुका म्हणे कृपा केली नारायणें।*
*जाणिजेते येणे अनुभवें॥*

कान्होबानं विचारलं, ''दादा, या पंधरा दिवसात जेवलात कुठं?''

तुकोबांनी सांगितले, ''जेवलोच नाही. काही खाल्लंच नाही. आणि खरं सांगू कान्होबा, मला भूक ती कशी लागलीच नाही. जेवणाखाणाची आठवणसुद्धा झाली नाही. आता तू विचारलंस तेव्हाच लक्षात आलं बघ :

*न मिळो खावया न वाढो संतान।*

*परि हा नारायण कृपा करो॥*
*ऐशी माझी वाणी मज उपदेशी।*
*आणीक लोकांसी हेंची सांगे॥*

"कान्होबा, घरी पोरं बाळं, आवली कशी आहेत?"

"दादा, सगळीजण तुमची वाट बघतायतं. काळजीत आहेत. चलता ना घरी?"

"चल. मला आता घर काय आणि दार काय, सगळं सारखंच."

तुकोबा कान्होबाच्या बरोबर घरी आले. त्यांना पाहताच सगळ्यांना आनंद झाला. त्यांना सुखरूप पाहून जिजाबाईचे डोळे आनंदाने पाझरू लागले.

थोड्यावेळानं जिजाबाईनं स्वयंपाक तयार केला. तुकोबाला ताट वाढलं. म्हणाली, "जेवा आता पोटभर."

तुकोबांनी विचारलं, "मी गेल्यापासून तू तर जेवली नाहीस, असं ऐकलं. तुला नाही अजून भूक लागली?"

"तुम्ही तरी कुठं जेवलात? तुम्हाला नाही भूक लागली?"

"आवले, माझं पोट भरलेलंच होतं."

"कशानं ते!"

"अग, देवाच्या भेटीनं." तुकोबांनी सांगितलं.

जिजाबाई म्हणाली, "होय का, मग माझं पण पोट भरलं."

"तुझं कशानं भरलंय्?"

"तुमच्यासारखंच की! देवाच्या भेटीनं."

"आवले, तुला देव भेटला?"

"हं!"

"कुठाय तो?"

"ह्यो काय माझ्यासमोर बसलाय. तुम्हीच माझा देव!"

जिजाबाईचं हे उत्तर ऐकून तुकोबा चकित झाले. म्हणाले, "खरं आहे तुझं आवले! प्रत्येक माणसाच्या अंतरात देव असतो, हे ज्ञान तू आज मला शिकवलंस."

"मी कसलं शिकवलं, अडाणी बोळा मी. तुमचं ऐकून ऐकूनच मी सांगितलं."

"माणसामाणसात देव असतो हेच खरं आहे आवले."

मग जिजाबाईनं विचारलं, "माझ्यावर रागावला नव्हता ना तुम्ही?"

"नाही ग. तुझं बोलणंही खरं होतं आणि तुझं मन तर त्याहून मोठं आहे."

"मग का गेला होता निघून?"

"देवाला हुडकायला. पण आता नाही जाणार. देव रानावनात, डोंगर-गुहेत असतो आणि माणसात नसतो, हे खरं नाही. देव सगळीकडं असतो. 'तीर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी।' आवले, क्षेत्राच्या ठिकाणी तीर्थ तीर्थ म्हणतात ते पाणीच असतं आणि देव देव म्हणतात तो पाषाणच असतो. पण खरा देव जर कुठं आहे असं म्हणशील तर तो सज्जनांच्या ठिकाणीच असतो."

२८४ 9/10/03

# मन करा रे प्रसन्न!

एके दिवशी तुकोबांनी घरातली कागदपत्रं बाहेर काढली. त्यात पूर्वी सावकारीचा धंदा असताना कुळांना कर्जाऊ दिलेल्या पैशाच्या वचनचिठ्ठ्या होत्या. जमिनींची गहाणपत्रं होती. तुकोबांनी विचार केला, कशाला आता ह्यांचं जतन करायचं? दुष्काळानं गोरगरीब नागवले आहेत. कंगाल बनले आहेत. त्यांच्याकडून आता कसली वसुली होणार आहे? त्रासलेल्या, पिडलेल्या जिवांच्या डोक्यावर कशाला आता हा आणखी भार?

तुकोबांनी सगळ्या कागदपत्रांचा ढीग केला. कान्होबाला बोलावले, "हे बघ, ही सगळी कागदपत्रं मी आता काढून टाकावीत म्हणतोय. कशाला ही सांभाळायची? ह्या मोहातूनही मोकळं होऊन जावं असं म्हणतोय. तुझं काय म्हणणं आहे?"

तुकोबा तुकोबाचं होते आणि त्यांचा भाऊ झाला तरी कान्होबा हा कान्होबाच होता. तो व्यवहारी मनुष्य होता. म्हणून तो म्हणाला, "दादा, ही वडिलार्जित मालमत्ता आहे. माझ्या उपयोगी येईल. असं करा, दोन हिस्से करा. माझा हिस्सा मला देऊन टाका."

तुकोबा म्हणाले, "ठीक आहे."

तुकोबांनी त्या कागदपत्रांचे दोन हिस्से केले. म्हणाले, "कान्होबा, कुठलाही एक हिस्सा घे."

कान्होबानं एक हिस्सा उचलला.

उरलेला हिस्सा तुकोबांनी एका फडक्यात गुंडाळला. ते

बोचकं घेऊन इंद्रायणीचा रस्ता धरला. तिथं आल्यावर त्या बोचक्यात एक मोठा दगडही बांधला आणि ते बोचकं इंद्रायणीच्या डोहात बुडवून टाकलं. हात झाडीत म्हणाले, "गंगामाई, सांभाळ हे. मला आता या मोहात ठेवू नकोस."

तुकोबा मोहपाशातून मोकळे झाले. पण टवाळांच्या टवाळीचा विषय ठरले. कोणी म्हणाले, "काय खुळा आहे तुक्या. होतं तेही घालवून बसला."

"आता मागा म्हणावं भीक दारोदार."

"मोठा आलाय संत-महंत. पोट भरायची अक्कल नाही. . . ."

गावात असे हसे झाले तर घरात जिजाबाईचे रागावणे झाले. तुकोबांनी कशाकडेच लक्ष दिले नाही. लक्ष दिले ते मात्र घरच्या पडक्या देवळाकडे.

विश्वंभरबुवांनी विठ्ठलाचं देऊळ बांधलं त्याला आता बरीच वर्षं होऊन गेली होती. अलिकडं तर त्याची काहीच डागडुजी झाली नव्हती. तुकोबांना वाटलं की ते थोडं नीटनेटकं करावं. म्हणजे मग आपणालाही भजन-कीर्तनाला बरं होईल. कारण आता गावातले चार भले लोकही त्यांच्याकडे येऊ लागले होते. त्यांच्याबरोबर भजन करू लागले होते. देवाचं नाव घेऊ लागले होते. काहीजणांना तर तुकोबांची योग्यताही पटू लागली होती.

तुकोबांनी देऊळ बांधायला काढलं. पैसाअडका जवळ नव्हताच. त्यांनीच धोतर वर खोचलं. चिखल केला. दगडधोंडा जमवला. ते पाहून गावातले चार भले मदतीला आले. गवंडी आला, सुतार आला, लोहार आला. विठोबाचं देऊळ नीटनेटकं

होऊन गेलं. मग देवळात अष्टौप्रहर टाळमृदुंगावर भजन घुमू लागलं. तुकोबा रसाळ कीर्तनही करू लागले. त्यांची भक्तीनं भिजलेली वाणी ऐकून ऐकणारे डोलू लागले. तुकोबा भजनातून परमार्थाची शिकवण देऊ लागले :

*मन करा रे प्रसन्न।*
*सर्व सिद्धींचे कारण॥*
*मोक्ष अथवा बंधन।*
*सुख समाधान इच्छा ते॥*
*मनें प्रतिमा स्थापिली।*
*मनें मना पूजा केली॥*
*मनें इच्छा पुरविली।*
*मन माउली सकळांची॥*
*मन गुरू आणि शिष्य।*
*करी आपुलेंचि दास्य॥*
*प्रसन्न आपआपणास।*
*गती अथवा अधोगति॥*
*साधक वाचक पंडित।*
*श्रोत्रे वक्ते ऐका मात॥*
*नाहीं नाहीं आनु दैवत।*
*तुका म्हणे दुसरें॥*

कीर्तन रंगत चालले होते. नित्य नवी अभंगवाणी प्रकट होत होती. डोलणारे डोलत होते. ऐकणारे ऐकत होते. पण तुकोबाला खुळा म्हणून हसणारे काही होतेच. आता तर ते आणखीनच

वाढले. कारण तुकोबांचं नाव जिकडं तिकडं होऊ लागलं. त्यांच्याबद्दल भलं बोललं जाऊ लागलं हे त्यांच्याविषयी मत्सर बाळगणाऱ्यांना कसं रूचावं? कसं पटावं? कसं सहन व्हावं?... ते आणखीनच तुकोबांची टवाळी करू लागले. पण तुकोबांनीच केव्हाच त्यांच्याकडं पाठ फिरवली होती. ते म्हणत होते:

*कोणी निंदा कोणी वंदा।*
*आम्हां स्वहिताचा धंदा॥*
*काय तुम्हासी गरज।*
*आम्ही भजूं पंढरिराज॥*
*तुम्हासारिखें चालावें।*
*तेव्हां स्वहिता मुकावें॥*
*तुका म्हणे हो कां कांहीं।*
*गळा दिला विठ्ठल पायी॥*

तुकोबा कीर्तन करू लागले. श्रोते तल्लीन होऊ लागले. पण त्यांना स्वतःच्या ठायीच्या उणिवांची जाणीव होती. म्हणून त्यांनी आपल्या विठ्ठलालाच विनविले होते की:

*गाऊं नेणे कळा कुसरी।*
*कान धरोनि म्हणे हरी॥*
*माझ्या बोबडिया बोला।*
*चित्त द्यावें वा विठ्ठला॥*
*मज हंसतिल लोक।*
*परी मी गाईन निःशंक॥*

*तुझें नामीं मी निर्लज्ज।*
*काय जनासवें काज॥*
*तुका म्हणे माझी विनंती।*
*तुम्ही परिसा कमळापती॥*

तुकोबा भजन-कीर्तन करूनच थांबत नव्हते तर त्यातील विचारानुसार ते तसे वागतही होते. 'बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले॥ – ' ही उक्ती त्यांचीच आहे. बोलल्याप्रमाणेच ते वागत होते. विचार आणि आचार यांचे त्यांच्या ठिकाणी एकरूपत्व झालेले होते. चराचरात ते भगवंत पाहात होते. सकल सृष्टीवर ते प्रेम करीत होते. त्यांच्या दृष्टीनं संतपण किंवा साधुत्व हे त्याच ठिकाणी दिसून येते की जो दीनदुबळ्यांची, रंजल्या-गांजल्यांची सेवा करीत आहे. त्याला आपले म्हणून जवळ करीत आहेत. परपीडा जाणणारा जो तोच वैष्णव. ही वैष्णवाची खूण जशी नरसी मेहताने सांगितलेली आहे तशीच खऱ्या साधुत्वाची खूण तुकोबांनीही आपल्या एका अभंगात सांगितलेली आहेः

*जे कां रंजले गांजले।*
*त्यांसि म्हणे जो आपुले॥*
*तोचि साधु ओळखावा।*
*देव तेथेंचि जाणावा॥*
*ज्यासी अपंगिता नाहीं।*
*त्यासी धरी जो हृदयीं॥*
*दया करणे जे पुत्रासी।*
*तेचि दास आणि दासी॥*

*तुका म्हणे सांगू किती।*
*तोचि भगवंताची मूर्ति॥*

तुकोबा एकदा नदीवरून येत होते. एक म्हातारी हंडा घेऊन पाण्याला आली होती. तिनं पाण्यानं हंडा भरला पण भरलेला हंडा तिला काही डोक्यावर घेता येईना. म्हणून तिनं जवळच असलेल्या दोघांतिघांना म्हटलं, "बाबा, जरा हात लावता कां? हंडा माझ्या डोक्यावर उचलून देता कां? पण त्या दोघातिघांनी तिच्या बोलण्याकडं लक्ष दिलं नाही. ते तसेच निघून गेले. तुकोबांनी ते पाहिलं. म्हातारीच्या जवळ जाऊन म्हणाले, "आजीबाई कुठाय तुमचं घर?"

म्हातारीनं घराचा पत्ता सांगितला. तुकोबांनी भरलेला हंडा उचलून आपल्या डोक्यावर घेतला. म्हणाले, "आजीबाई चला, घर दाखवा."

म्हातारी म्हणाली, "अरे बाबा तूरे कशाला घेतलास हंडा?"

तुकोबा म्हणाले, "आजीबाई, तुमचा मुलगा असता तर त्यानं तुम्हाला डोक्यावर हंडा घेऊ दिला असता कां? मला तुम्ही तुमचा मुलगाच समजा. आईची सेवा करणं यासारखं पुण्य कोणतं?"

म्हातारीनं तोंड भरून आशीर्वाद दिले!

एकदा तुकोबा असेच चालले होते. ठिकठिकाणी दुष्काळानं खचलेली गाईगुरं पाहात होते. दुष्काळात चारापाण्याची आबाळ झाल्यामुळं काही जनावरांना तर बसल्या जागेवरून उठताही येत नव्हतं. त्यांच्या हाडांचे सांगाडेच नुसते उरले होते. तुकोबांचं मन

हळहळलं काळीज दुखावलं. ते घरी गेले. घरातलं खुरपं घेतलं आणि डोंगराच्या वाटेला लागले. जिथं कुठं हिरवं गवत आढळलं ते त्यांनी कापून घेतलं. गवताचा भला मोठा भारा बांधून झाला. तुकोबांनी तो डोक्यावर घेतला आणि भुकेजलेल्या जनावरांच्या पुढं गवत टाकत ते फिरले. पुढं कित्येक दिवस त्यांचा जणू नियमच झाला होता.

अशी परोपकाराची कामं तुकोबा करीत होते. पण उपकाराची भावना त्यांच्या चित्तात मुळीसुद्धा नव्हती.

जिजाबाई कान्होबाच्या साहाय्याने घरची शेती बघत होती. थोडं बरं चाललं होतं. एकदा ती तुकोबांना म्हणाली, "माझ्या मनात काय आलं सांगू कां?"

तुकोबा हसून म्हणाले, "काय आलंय तुझ्या मनात आवले? सांग की."

"माझ्या मनात आलंय की आपण एक लहानसं दुकान घालावं."

"लहानसं का? मी तर भलं मोठं दुकान घालणार आहे."

"खरंच म्हणतां?"

"आवले, मी कधी खोटं बोलतो कां?"

"नाही, पण कशाचं दुकान घालायचं म्हणतां?" जिजाबाईनं उत्सुकतेनं विचारलं. तुकोबांनी हसून सांगितलं, "अग, मी सुखाच्या पेठेत भक्तीभावाचं दुकान घातलं. माझ्या दुकानात रामनामाचा वाण भरलेला आहे. अग, मागं जे जे भाग्यवंत होऊन गेले त्या सगळ्यांनी हाच माल भरलेला होता. हा माल चोख असतो. त्यात भेसळ, मिसळ, वाईट, टाकाऊ असलं काही नसतं. शुद्ध माल असतो. हा शुद्ध माल ज्याचं चित्त शुद्ध असेल

त्यानं हवा तेवढा लुटावा. पैशाअडक्याचं काहीच काम नाहीः

*भक्तिभाव आम्ही बांधिलासे गांठीं।*
*सादावितों हाटी घ्या रे कोणी॥*
*सुखाचिया पेठे घातिला दुकान।*
*मांडियेला वान रामनाम॥*
*मागें भाग्यवंत झाले थोरथोर।*
*तिहीं केला फार हाचि सांठा॥*
*सुखाचें फुकाचें सकळाचें सार।*
*तरावया पार भवसिंधु॥*
*खोटें कुडें तेथें नाही घातपात।*
*करीं शुद्ध चित्त तुका म्हणे॥*

अशी आगळी वेगळी दुकानदारी तुकोबांनी आता थाटली होती. ही बुडण्याची भीतीच नव्हती. हा व्यापार दिवाळखोर बनवणारा नव्हता तर तारणारा होता. तुकोबा मनानं निश्चिंत निर्विकार बनलेले होते. त्यांना आता निंदा-स्तुतीचे सोयरसुतक उरलेले नव्हते. तथाकथित लोकलज्जेच्या पलीकडं ते पोचले होते. म्हणून प्रपंचात असूनही ते प्रपंचाच्या पैल गेलेले होते. त्यांना आता त्यांच्या विठ्ठलाशिवाय दुसरे काही श्रेय अथवा प्रेय उरलेले नव्हते. म्हणून त्यांनी विठ्ठलालाही सांगितले होतेः

*पावलें पावलें तुझें आम्हां सर्व।*
*दुजा नको भाव होऊं देऊं॥*
*जेथें तेथें देखे तुझींच पाउलें।*
*त्रि-भुवन संचलें विठ्ठला गा॥*

*भेदाभेद-मतें भ्रमाचे संवाद।*
*आम्हां नको वाद त्यांशी देऊं।।*
*तुका म्हणे अणु तुजविण नाही।*
*नभाहूनि पाही वाढ आहे।।*

++

# नाचू कीर्तनाचे रंगी!

तुकोबांची ख्याती आता हरिभक्त कीर्तनकार म्हणून सगळीकडं पसरू लागली होती. तुकोबांना लोक साधू म्हणून ओळखू लागले होते. काहीजण भक्तीभावानं त्यांच्या पायाही पडू लागले होते पण तुकोबांना ह्या प्रकाराने अवघडल्यासारखे होऊन जात होते. लोकांच्या प्रेमाचे ते भुकेले होते पण लोकांनी आपल्यालाच देव किंवा संत-साधू करून टाकावे हे मात्र त्यांना पसंत नव्हते. या सगळ्या प्रकारातून अहंकाराची बाधा केव्हा जडेल हे काही सांगता येत नाही, हे ते ओळखून होते. म्हणून त्यांनी देवाजवळ, 'मला तू तसलं पांडित्य किंवा मोठेपण देऊ नकोस' असं विनवलं होतंः

*ज्ञानियांचे घरी चोजवितां देव।*
*तेथे अहंभाव पाठी लागे।।*
*म्हणोनियां ऐसे सांडिले उपाय।*
*धरियेले पाय दृढ तुझे।।*
*वेदपरायण पंडित वाचक।*

*न मिळती एक एकांमधी ॥*
*पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा।*
*तेथें देखें चेष्टा विपरीत ॥*
*आपुलिया नाहीं निवाले जे अंगें।*
*योगी करती रागें गुरगुरू ॥*
*तुका म्हणे मज कोणांचा पांगिला।*
*नको बा विठ्ठला करूं आतां ॥*

तुकोबांच्या कीर्तनाला देहूतले असेच एक श्रेष्ठी येत असत. ते मोठे धनिक सावकार होते. वार्धक्यात देव देव करू लागले होते. तुकोबांच्या कीर्तनाला नियमाने जाऊ लागले होते. तुकोबांच्या रसाळ वाणीचा उपदेशांचा त्यांच्या मनावर चांगला प्रभाव पडला होता. ते तुकोबांचे भक्तच बनले होते. तुकोबा कीर्तनाला उभे राहिले म्हणजे ते मोठ्या भक्तीने पाहात असत. तुकोबा आपले साधे भोळे. त्यांच्या अंगातली पैरण बरीच फाटली होती. सावकारांना वाटले, तुकोबांना एक चांगली पैरण आपण द्यावी. म्हणून त्यांनी चांगल्या भारी कापडाची पैरण शिंप्याकडून शिवून घेतली. कापड भारी होते म्हणून पैरणीला आतून अस्तरही लावले होते. पैरण तयार झाल्यावर दुपारी सावकार कीर्तनाला येताना घेऊन आले. कीर्तन झाल्यावर तुकोबांना त्यांनी पैरण दिली. तुकोबांनी 'नको नको' म्हटले पण सावकारांनी काही ऐकले नाही. तुकोबांना त्यांनी ती पैरण घेण्याचा आणि उद्या कीर्तनाला येताना घालून येण्याचा आग्रहच केला. त्यांच्या अति आग्रहापुढं तुकोबांचा नाईलाज झाला.

दुसऱ्या दिवशी दुपारी कीर्तनाच्या वेळेच्या थोडे आधीच सावकार लगबगीनं देवळात जाऊन बसले. त्यांना उत्सुकता होती की, महाराज आज अंगात आपण दिलेली नवी पैरण घालून कीर्तनाला आल्यावर कसे दिसतील हे पाहाण्याची. वेळ झाल्यावर तुकोबा आले. देवाला आणि श्रोत्यांना नमस्कार करून कीर्तनाला उभे राहिले. सावकार डोळे विस्फारून पाहू लागले. महाराजांच्या अंगात नवी पैरण होतीच पण ती उलटीच घातलेली होती! म्हणजे अस्तर वर आलेले होते आणि कापड आत गेलेले होते. हा प्रकार पाहून सावकार म्हणाले, ''महाराज अंगातली पैरण तुम्ही उलटी घातलेली आहे. अस्तर वर आलेले आहे आणि कापड आत गेलेले आहे.''

तुकोबा हसून म्हणाले, ''नाही सावकार, तुम्ही एवढं भारी मऊ मऊ कापड पैरणीसाठी दिलं ते माझ्या देहाला सुख व्हावं म्हणूनच ना? म्हणून मी ते आत घातलं. कसं मऊ मऊ वाटतंय.''

तुकोबांच्या या उद्‌गारांनी सावकार गप्प बसले. तुकोबांच्या कृतीमधला मतलब कळून चुकले. तुकोबांसारख्या निस्पृह, विदेही साधू पुरुषाला शरीराची शोभा वाढविण्यात किंवा त्याचे लाड पुरविण्यात स्वारस्य नाही, हे ते उमगले.

तुकोबांनी कीर्तनासाठी व्यासंगही पुष्कळ केला होता. आपल्या आधीच्या संतांची अभंगवाणी, भगवद्‌गीता, योगवासिष्ठ इत्यादी ग्रंथांचे अध्ययन त्यांनी मोठ्या परिश्रमपूर्वक केले होते. त्याशिवाय भर्तृहरीची नीती-वैराग्य शतके, पांडुरंगाष्टकं इत्यादी संस्कृतातील काव्यही त्यांनी नीट

अभ्यासून मुखोद्गत केले होते. या अभ्यासानें त्यांच्यात पुष्कळच बहुश्रुतपणा आलेला होता. पाठांतरही पुष्कळच झालेले होते. या व्यासंगाच्या बळावर आणि खरे म्हणजे अंतरातल्या अलोट भक्तीप्रेमामुळे तुकोबांचे कीर्तन श्रवणीय होत असे. कीर्तनात ते स्वतःला विसरून जात असत. विठ्ठलमय होत असत. देहभान हरपून नाचत, डोलत असत. तुकोबांनीच म्हटले आहे:

*कीर्तन चांग कीर्तन चांग।*
*होय अंग हरिरूप॥*
*प्रेमाछंदें नाचे डोले।*
*हारपला देहभाव॥*
*एकदेशीं जीवकळा।*
*हा सकळां सोयरा॥*
*तुका म्हणे उरला देव।*
*गेला भेव त्या काळें॥*

कीर्तन ऐकण्यासाठीही ते सदैव भुकेजलेले असत. उत्सुक असत. तुकोबांनीच म्हटले आहे:

*कीर्तन ऐकावया भुलले श्रवण।*
*श्रीमुख लोचन देखावया॥*
*उदित हें भाग्य होईल कोणे काळीं।*
*चित्त तळमळी म्हणऊनि॥*
*उतावीळ वाह्या भेटिलांगी दंड।*
*लोटांगणी धड जावयासी॥*
*तुका म्हणे माथा ठेवीन चरणी।*

*होतील पारणी इंद्रियांची॥*

कीर्तनाविषयी तुकोबांच्या मनी एवढी भक्ती व आदर होता की, कीर्तनाचा धंदा मांडणाऱ्यांना त्यांनी एका अभंगात चांगलेच फटकारले आहे. त्याला त्यांनी मातृगमनी, चांडाळ असे म्हटलेले आहे आणि त्याचं तोंडही बघणं नको असं म्हटलेलं आहे:

*कीर्तनाचा विक्रा मातेचे गमन।*
*भाड खाई धन विटाळ तो॥*
*हरिभक्ताची माता हे हरिगुणकीर्ति।*
*इतवर पोट भरिती चांडाळ ते॥*
*अंत्यज हा ऐसें कल्पांती करीना।*
*भाड हे खाईना जननीची॥*
*तुका म्हणे त्यांचे दर्शन ही खोटें।*
*पूर्वजासि नेटें नरका धाडी॥*

संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' असे म्हटले आहे. तुकोबांनी देखील नामदेवांप्रमाणेच कीर्तनाच्या द्वारा मराठी मुलुखात भक्तीची पेठ गजबजून टाकली. परमार्थाची शिकवण अत्यंत सरळ, सोप्या व रसाळ भाषेत सामान्यजनांना दिली.

कीर्तन ही नारदाची गादी आहे. तुकोबांनी तिची प्रतिष्ठा उत्तम राखली.

जिथे कीर्तन चालते तिथे देवाची वसती असते. हरीचे गुणगान गात फिरणाऱ्या भक्ताबरोबर देवही फिरत असतो. नारदमुनींचा संचार त्रैलोक्यात होता, त्यांच्या बरोबर देवही

हिंडत फिरत होते. तुकोबा म्हणतात, हरिनामाच्या कीर्तनाचीच मला गोडी आहे, त्याशिवाय इतर काहीही मला आवडत नाही:

*कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव।*
*पंढरीचा राव संगीं आहे॥*
*भक्त जाय (जाइ) सदा हरि कीर्ति गात।*
*त्यासवें अनंत हिंडतसे॥*
*त्रैलोक्य भ्रमण फिरत नारद।*
*त्यासंगें गोविंद फिरतसे॥*
*नारद मंजुळ सुस्वरें गीत गाये।*
*मार्गी चालताहे संगे हरि॥*
*तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची।*
*नाहीं आणिकांची प्रीती ऐसी॥*

कीर्तनाच्या व हरिनामाच्या महत्तेविषयी तुकोबांनी एका अभंगात म्हटले आहे की, सात दिवसांचा उपाशी असला तरी त्यानं कीर्तन ऐकण्याचे सोडू नये. मस्तक फुटलं आणि शरीर तुटलं तरी कीर्तनाचा रंग सोडू नये आणि असा निर्धार ज्याच्याजवळ असतो तिथेच सदैव देव असतो:

*सातादिवसांचा जरी जाला उपवासी।*
*तरी कीर्तनासी टाकूं नये॥*
*फुटो हा मस्तक तुटो हें शरीर।*
*नामाचा गजर सोडूं नये॥*
*शरीराचे होत दोनी ते ही भाग।*
*परि कीर्तनाचा रंग सोडों नये॥*

*तुका म्हणे ऐसा नामीं ज्या निर्धार।*
*तेथे निरंतर देव असे॥*

# 'रामकृष्णहरि'

तुकोबा कीर्तनात रंगले होते. प्रपंचात विस्मरले होते. देहकर्मात विरक्त झाले होते. सुख-दुःखाच्या पल्याड गेले होते.

*प्रपंच परमार्थ संपादोनि दोन्ही।*
*एकही निदानीं न घडे त्यासी॥*
*दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात।*
*शेवटीं अपघात शरीराचा॥*
*तुका म्हणे तया दोहींकडे धका।*
*शेवटीं तो नरकामाजी पडे॥*

हे सत्य ते पुरेपूर जाणून होते. म्हणूनच त्यांनी सगळ्या विकारांना दूर सारले आणि अखंड आनंदाचा कंद जवळ केलाः

*आनंदाचा कंद गाइयेला गीतीं।*
*पाहियेला चित्तीं देवराव॥*
*देवराव तो ही आहे निश्चयेसीं॥*
*अखंड नामासी बोलवितो॥*
*बोलवितो मज कृपा तो करूनि।*
*तुका म्हणे मनीं धरा भाव॥*

अशी जरी स्थिती झालेली होती, तरी त्यांच्या मनी एक खंत मात्र जागीच होती; आणि ती म्हणजे अजून त्यांना गुरुप्रसादाचा लाभ झाला नव्हता. 'गुरुविण कोण दाखविल वाट?' हे गुरुचे महात्म्य ते जाणून होते. म्हणून त्यांना आता 'वाटाड्या' हवा होता. मार्गदर्शक पाहिजे होता. अशा वाटाड्याशिवाय ब्रम्हज्ञान काय किंवा विठ्ठलाची प्रेमखूण कांय, आकलन होणे अवघड असते. अशी खूण पटवणारा त्यांना हवा होता :

*गुरुचिया मुखें होइल ब्रम्हज्ञान।*
*न कळे प्रेमखुण विठोबाची।।*
*वेदातें विचारा पुराणातें पुसा।*
*विठोबाचा कैसा प्रेमभाव।।*
*तुका म्हणे सांडा जाणिवेचा शीण।*
*विठोबाची खूण जाणती संत।।*

सद्‌गुरु कृपेशिवाय बोललेली वाणी ही व्यर्थ आहे आणि ज्याला गुरु नाही तो अखंड सुतकात असल्यासारखाच असतो. तुकोबांनी एका अभंगात म्हटलेच आहे :

*सद्‌गुरुवांचूनि प्रेतरूप वाणी।*
*बोलती पुराणीं व्यासऋषि।।*
*म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड।*
*निगुरा अखंड सुतकाला।।*
*कोणे परी तया नव्हे चि सुटका।*
*देह त्याचा लटिका जाणा तुम्ही।।*
*तुका म्हणे ऐसीं बोलती पुराणें।*

*संतांचीं वचनें मागिलां हो॥*

तुकोबांनी सद्‌गुरुची महती जशी गायलेली आहे तशीच खोट्या – दांभिक गुरुची रेवडीही उडवलेली आहे:

*जळोजळो तें गुरुपण।*
*जळोजळो तें चेलेपण॥*
*गुरु आला वेशीद्वारीं।*
*शिष्य पळतो खिंडोरी॥*
*काशासाटीं जालें येणें।*
*त्याचें आलें वर्षासन॥*
*तुका म्हणे चेला।*
*गुरु दोघे हि नरकाला॥*

आणखी एका अभंगात खोट्या गुरुचे खोटेपण तुकोबा अशारीतीने उभे करतात:

*शिष्या सांगे उपदेश।*
*गुरुपूजा हे विशेष॥*
*दावी आचार सोवळे।*
*दंड कमंडलु माळे॥*
*छाटी भगवी मानसीं।*
*व्यर्थ म्हणवी सन्यासी॥*
*तुका म्हणे लोभ।*
*न सुटे नाहीं लाभ॥*

तुकोबा सद्‌गुरूच्या प्राप्तीसाठी तळमळत होते. आपल्या

**वाटाड्याची वाट आर्तपणाने पाहात होते. सद्गुरु 'भेटणार-भेटणार!' अशीही त्यांना खात्री वाटत होती; आणि ती खरीही ठरली!**

एकदा तुकोबा सद्गुरूंच्या ध्यासात मग्न असताना झोपून गेले. झोपेत त्यांना स्वप्न पडले :

तुकोबा स्नानासाठी इंद्रायणीची वाट चालत आहेत, खांद्यावर धोतर टाकलेलं आहे, हातात तांब्या घेतलेला आहे, मुखानं हरिनाम चाललेलं आहे, ते आपल्याच तंद्रीत तल्लीन आहेत तेवढ्यात हाक कानावर आली,

''तुकारामा!''

''तुकोबांनी चमकून पाहिलं, तर समोर साक्षात सद्गुरूच उभे! मुद्रेवर ज्ञानाचे तेज झळकत होते, ओठावर हास्य खेळत होते, डोळ्यात वात्सल्य ओथंबले होते!. . .

कसे कोणास ठाऊक, पण तुकोबांना सद्गुरूंची 'खूण' पटली. ओळखदेख न सांगता-सवरतांच त्यांनी सद्गुरूंना जाणले!

तुकोबांनी पटकन वाकून सद्गुरूच्या चरणावर मस्तक टेकवले. डोळ्यांतील अश्रूंनी चरण धुऊन काढले. मग सद्गुरूंनी त्यांना आपल्या दोन्ही हातांनी उठवून त्यांना हृदयाशी धरले. विचारले, ''पटली ओळख?''

''होय, पटली!''

''बाबाजी चैतन्य म्हणतात मला. राघव चैतन्य हे माझ्या गुरूचे नाव. केशव चैतन्य हे त्यांच्या गुरूचे नाव. म्हणजे केशव चैतन्य – राघव चैतन्य – बाबाजी चैतन्य अशी तुझी गुरू परंपरा.''

"मी धन्य झालो! आता मला मंत्राचा प्रसाद द्यावा!"
"म्हण, – 'रामकृष्णहरि'!"
तुकोबांनी मंत्र म्हटला, "रामकृष्णहरि!"

गुरूदर्शनानं आणि मंत्रप्राप्तीनं तुकोबा फार फार आनंदून गेले. फार फार सुखावून गेले. सद्‌गुरूंना म्हणाले, "काही सेवा असेल तर सांगा." सद्‌गुरू म्हणाले, "आमच्याजवळ सगळं आहे. जेवणासाठी पावशेर तूप हवं आहे, तेवढं दे!"

सद्‌गुरूंची आज्ञा घेऊन तुकोबा झरझर घरी आले. तूप घेऊन लगेच, जणू पळतच इंद्रायणीवर गेले. पण तिथं सद्‌गुरू दिसले नाहीत. तुकोबांनी इकडं तिकडं पाहिलं, शोधलं; पण सद्‌गुरु नव्हतेच! आपलं काम करून ते अंतर्धान पावले होते!

तुकोबांना वाईट वाटलं आणि त्यानंच ते जागे झाले. "म्हणजे! स्वप्नातच सद्‌गुरूंचे दर्शन घडले आणि मंत्राचा लाभ झाला म्हणायचा! पांडुरंगा तुझी इच्छा!"

**तुकोबा मनानं निश्चिंत झाले होते. अती आनंदून गेले होते. त्यांना गुरुप्रसाद मिळाला होता. तो गुरुवारचा दिवस होता शके १५५४ मधला माघ महिना होता आणि शुद्ध दशमी ही तिथी त्या दिवशी होती. तुकोबांनीच या स्वप्न-साक्षात्काराबद्दल एका** अभंगात सांगितले आहे :

*सत्य गुरुरायें कृपा मज केली।*
*परि नाही घडली सेवा कांहीं॥*
*सांपडविले वाटे जातां गंगास्नाना।*
*मस्तकीं तो जाणा ठेविला कर॥*
*भोजना मागती तूप पावशेर।*

*पडिला विसर स्वप्नामाजीं॥*
*काय कळे उपजला अंतराय।*
*म्हणोनियां काय त्वरा झाली॥*
*राघव चैतन्य केशव चैतन्य।*
*सांगितली खूण माळिकेची॥*
*बाबाजी आपुलें सांगितले नाम।*
*मंत्र दिला रामकृष्णहरीं॥*
*माघ शुद्ध दशमी पाहोनि गुरुवार।*
*केला अंगीकार तुका म्हणे॥*

तुकोबांना सद्‌गुरुच्या कृपाप्रसादांचा असा लाभ घडला आणि त्यांच्या मनीची इच्छा-आकांक्षा पूर्ण झाली. त्यांना हवा होता तो वाटाड्या मिळाला. त्यानं दाखवलेल्या वाटेनं तुकोबांची पुढची वाटचाल सुलभ झाली. या विषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करताना तुकोबांनी म्हटले आहे :

*माझिये मनींचा जाणोनियां भाव।*
*तो करी उपाव गुरुराजा॥*
*आवडीचा मंत्र सांगितला सोपा।*
*जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें॥*
*जाती पुढें एक उतरले पार।*
*हा भवसागर साधुसंत॥*
*जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी।*
*उतार सांगडी तापे पेटीं॥*
*तुका म्हणे मज दावियेला तारू।*
*कृपेचा सागरू पांडुरंग॥*

# तुका म्हणे

सद्‌गुरूंच्या कृपेचा प्रसाद लाभला आणि तुकोबांचा अभंग 'तुका म्हणे' या नाममुद्रेसह भरतीच्या समुद्रलहरींसारखा त्यांच्या अंतःकरणातून उचंबळून प्रकट होऊ लागला. तुकोबा कवी होतेच, ते महाकवी झाले.

आयुष्याच्या वीशी-पंचविशीपर्यंत तुकोबा प्रपंच रगाड्यात जरी रखडत होते, तरी त्यांच्यातल्या कवित्वाचा अंकूर करपलेला नव्हता. तो ताजातवाना व टवटवीत होता. ते मुळातच कवी होते. त्यांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे 'तुका म्हणे झरा। आहे मुळिचाच खरा॥' त्यांचा प्रतिभा-निर्झर अंतरात वाहाताच होता. तो जातिवंत आणि अस्सल होता. म्हणूनच आलेल्या आपत्तींनी आणि कोसळलेल्या संकटांनी तो सुकला नाही की आटला नाही उलट त्यातून मिळालेल्या विविध तऱ्हेच्या अनुभवांना तुकोबांनी आपल्या कवित्वात साकार करून ठेवले! कवीचे मन हळुवार तरल आणि सूक्ष्म संवेदनाशील असते. जीवनातील बरे-वाईट अनुभव ते तत्परतेने टिपते. त्या अनुभवांना प्रतिभेचा स्पर्श घडला की मग त्यातूनच साहित्यनिर्मिती होते. तुकोबांना व्याप-तापातूनही काव्य-निर्मितीची प्रेरणा मिळाली.

हे जरी खरे असले तरी आपल्या कवित्वाच्या संदर्भात तुकोबांनी दोन महत्त्वाचे उल्लेख आपल्या कवित्वातच करून ठेवलेले आहेत. एक उल्लेख आहे नामदेवांचा आणि दुसरा आहे

सद्‌गुरूंचा. नामदेवांबरोबर त्यांच्या आदिदैवताचा – पांडुरंगाचा उल्लेख आहेच. पांडुरंगासह नामदेव त्यांच्या स्वप्नात आले आणि त्यांनी आपला शतकोटी अभंगाचा संकल्प सिद्धिस नेण्यास सांगितले असे तुकोबांनी एका अभंगातच म्हटले आहे:

*नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें।*
*सवें पांडुरंगें येऊनियां॥*
*सांगितलें काम करावें कवित्व।*
*वाउगें निमित्य बोलों नको॥*
*माफ टाकी सळ धरिली विठ्ठलें।*
*थापटोनि केलें सावधान॥*
*प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी।*
*उरले शेवटीं लावी तुका॥*

तुकोबा जागे झाले. आणि या स्वप्न-साक्षात्काराने पुष्कळसे आनंदले. आणि काहीसे गडबडले देखील. आनंदला तो त्यांच्यातला कवि आणि गडबडला तो त्यांच्यातला माणूस. कारण ही आज्ञा आपल्याकडून निभविली जाईल कां? अशी स्वाभाविक शंकाही त्यांना आल्याशिवाय राहिली नाही. पण त्यांचा सगळा भरिभार त्यांच्या पांडुरंगावरच होता. म्हणून ते उठले आणि विठ्ठलाच्या मूर्तीपुढे जाऊन हात जोडून प्रार्थना करीत म्हणाले :

*द्याल ठाव तरि राहेन संगती।*
*संतांचे पंगती पायांपाशीं॥*
*आवडीचा ठावं आलोंसे टाकून।*

*आतां उदासीन न धरावे॥*
*सेवटील स्छळ नीच माझी वृत्ति।*
*आधारे विश्रांती पावईन॥*
*नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी।*
*प्रसाद हा पोटीं राहिलासे॥*

तुकोबांनी अशी विनवणी पांडुरंगाच्या चरणी केली. कारण ते लीन तर होतेच, पण कवित्वाची प्रक्रिया देखील त्यांना ठाऊक होती. पांडित्याच्या बळावर काव्य रचता येते पण काव्यात अभिप्रेत असलेला काव्य-प्रसाद हा गुण आणता येत नाही हे देखील त्यांना पक्के ठाऊक होते. म्हणूनच त्यांनी :

व्युप्तीच्या बळें कवित्व करी चांग।
प्रसादाचे अंग त्यासी नोहे॥

असे अनुभवाने म्हणून ठेवलेले आहे. या विषयीच आणखी एका अभंगात म्हणताना त्यांनी सत्य आणि असत्य यातील भेद मजेदार रीतीने व्यक्त केलेला आहे :

*चातुर्याचे योगें कवित्व करिती।*
*प्रासादिक रंग आणितां नये॥*
*संन्याशाचे सोंग संपादिले सांग।*
*वैराग्याचें अंग आणितां नये॥*
*चंद्र-सूर्य-चित्रें लिहिताति भिंती।*
*प्रकाशाचें अंग लिहितां नये॥*
*शिपायाचे सोंग आणितां येईल सांग।*
*शूरत्वाचें अंग आणितां नये॥*

*तुका म्हणे गाऊन नाचून करितील सीमा।*
*पांडुरंगी प्रेमा आणितां नये॥*

तुकोबांनी वेळोवेळी दंभावर प्रहार केले आहेत. दांभिकांना त्यांनी परखडपणाने चांगलेच फटकारलेले आहे. फटकळ किंवा तोंडाळ वाटण्याइतके त्यांचे बोल कधी कधी उमटतात, पण त्याला त्यांचाही नाईलाज असावा. कारण ढोंग, दंभ, असत्य, अन्याय या दुर्गुणांविषयी त्यांच्या मनी इतकी चीड आहे की तीच जळजळीत शब्दांचे वाटे प्रकट होताना दिसते. सत्‌कवी आणि खोटा कवडा यांच्याविषयी देखील त्यांनी असेच खरमरीत उद्‌गार काढलेले आहेत. स्वतःला कविश्वर म्हणवून घेणाऱ्या कवड्यांचा तर विटाळच मानतात :

*कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ।*
*प्रसाद वोंगळ चिवडिती॥*
*दंभाचे आवडी वहिराट अंधळे।*
*सेवटासि काळें होईल तोंड॥*
*सोन्यासेजारी तो लाखेची जतन।*
*सतंत ते गुण जैसेतैसे॥*
*सेव्यसेवकता न पडतां ठावी।*
*तुका म्हणे गोवी पावती हीं॥*

नामदेव आणि श्रीविठ्ठल यांच्या आज्ञेनुसार तुकोबांनी जसे कवित्व केले तसेच त्यांनी 'सद्‌गुरुंच्या उपदेशानंतर आपल्याला कवित्वाची स्फूर्ती झाली' असे एका अभंगात नमूद केलेले आहे. ते म्हणतात .

*सत्य असत्यासी मन केले ग्वाही।*
*मानियेलें नाही बहुमतां।।*
*मानियेला स्वप्नीं गुरुचा उपदेश।*
*धरिला विश्वास दृढनामीं।।*
*यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ती।*
*पाय धरिले चित्ती विठोबाचे।।*

तुकोबांची अभंगवाणी आता सद्‌गुरूंच्या कृपा-प्रसादाने अधिक दृढ आणि धीट बनली होती. वाटाड्याने त्यांना जी परमार्थाची वाट दाखविली होती त्या वाटेनेच जाऊन त्यांनी सकलांना उपदेश दिला. पण हा उपदेश देताना सुद्धा त्यांना आपल्या अधिकाराची पुरेपूर जाणीव होती. त्यांनी एका अभंगात म्हटलेच आहे :

*अधिकार तैसा करूं उपदेश।*
*साहे ओझें त्यास तें चि द्यावे।।*
*मुंगीवरी भार गजाचे पाळण।*
*घालितां तें कोण कार्यसिद्धि।।*
*तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी।*
*प्रसंगी तों काढी पारधी तो।।*

आपला अधिकार जाणून तुकोबांनी जनलोकांस मनाची महती सांगितली आहे. मन प्रसन्न, स्वच्छ, निर्मळ असेल तरच मनीच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण होतात. तुकोबा सांगतात :

*मन करा रे प्रसन्न।*
*सर्व सिद्धीचे कारण।।*

*मोक्ष अथवा बंधन।*
*सुख समाधान इच्छा ते॥*
*मनें प्रतिमा स्थापिली।*
*मनें मना पूजा केली॥*
*मने इच्छा पुरविली।*
*मन माउली सकळांची॥*
*मन गुरु आणि शिष्य।*
*करी आपुलेंचि दास्य॥*
*प्रसन्न आपआपणास।*
*गति अथवा अधोगति॥*
*साधक वाचक पंडित।*
*श्रोते वक्ते ऐका मात॥*
*नाही नाही आनु दैवत।*
*तुका म्हणे दुसरे॥*

एका अभंगात तुकोबा जनलोकांना भव-रोगावर औषधोपचार सुचवीत आहेत. ते सांगतात :

*ब्रम्ह – रस घेई काढा।*
*तेणे पीडा वारेल॥*
*पथ्य नाम विठोबाचें।*
*आणिक वाचे न सेवीं॥*
*भव-रोगा ऐसे जाय।*
*आणिक काय क्षुल्लक॥*
*तुका म्हणे नव्हे बाधा।*
*आणिक कदा भूतांची॥*

एका अभंगात तुकोबांनी कोणता दिवस कसा उगवेल आणि कोणावर कधी कसला प्रसंग ओढवेल हे काही सांगता येत नाही म्हणून माणसाने सुख आणि दुःख हे सारखेच मानावे असा गीतेप्रमाणेच उपदेश केलेला आहे :

*कई वाहावे जीवन।*
*कई पलंगी शयन॥*
*जैसी जैसी वेळ पडे।*
*तैसे तैसें होणें घडे॥*
*कई भोज्य नाना परी।*
*कई कोरड्या भाकरी॥*
*कई बैसावें वाहनी।*
*कई पाई अनवाणी॥*
*कई उत्तम प्रावणें।*
*कई वसनें ती ही जीर्णें॥*
*कई सकळ संपत्ती।*
*कई भोगणें विपत्ति॥*
*कई सज्जनासी संग।*
*कई दुर्जनासी योग॥*
*तुका म्हणे जाण।*
*सुख दुःख तें समान॥*

हरिभक्त कसे असतात हे तुकोबांनी एका अभंगात फारच चांगल्या रीतीने सांगितलेले आहे. ते म्हणतात :

*मऊ मेणाहून आम्ही विष्णु-दास।*

*कठिण वज्रास भेदूं ऐसे॥*
*मेले जित असों निजोनियां जागे।*
*जो जो जें जें मागे तें तें देऊ॥*
*भले तरे देऊं कासेची लंगोटी।*
*नाठाळाचे काठी देऊं माथां॥*
*माय-बापांहुनि बहु मायावंत।*
*करु घात-पात शत्रूहूनि॥*
*अमृत तें काय गोड आम्हांपुढे।*
*विष तें बापुडें कडू किती॥*
*तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड।*
*ज्याचे पुरें कोड त्याचे परी॥*

एका अभंगात तर तुकोबांचा आत्मविश्वास फारच उत्तम रीतीने प्रकट झालेला आहे. पढीक पंडितांना उद्देशून ते ठणकावून सांगतात :

*वेदाचा तो अर्थ आम्हांसी च ठावा।*
*येरांनी वाहावा भार माथा॥*
*खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं।*
*भार धन वाही मजुरीचें॥*
*उत्पत्ति पाळणसंहाराचे निज।*
*जेणें नेलें वीज त्याचे हातीं॥*
*तुका म्हणे आलें आपण चि फळ।*
*हातोहातीं मूळ सांपडले॥*

तुकोबांनी एका अभंगात हरिभक्ताची निर्भयता देखील जाहीर

केलेली आहे :

*हरीचीया दासा नाहीं भय-चिंता।*
*दुख नीवारीता नारायण॥*
*नलगे वहाणें संसार-उद्वेग।*
*जडों नेदी पांग देव-राय॥*
*असो द्यावा धीर सदा समाधान।*
*आहे नारायण जवळी च॥*
*तुका म्हणे माझा सखा पांडुरंग।*
*व्यापीयेलें जग तेणें ऐकें॥*

इतरांनी कीव करावी असे आम्ही विठोबाचे भक्त नसून आमच्या विठोबास्वामींच्या सत्तेमुळे आम्हाला सगळेच ठेंगणे झालेले आहे. इतकेच काय, कळीकाळ देखील आमच्या हाताखाली आला आहे आणि यामुळेच आम्हाला विठोबाचे अंकीत म्हणवून घेण्यात अभिमानच वाटतो :

*तैसें नव्हों आम्ही विठोबाचे दास।*
*यावें आणीकास काकुळती॥*
*स्वामीचीये सत्ते ठेंगणें सकळ।*
*आले कळी-काळ हाताखालीं॥*
*अंकिताचा असे अभि-मान देवा।*
*समर्पूनी ठेवा असें पायीं॥*
*तुका म्हणे आम्हां इच्छेचें बोलणें।*
*कोड नारायणें पूरवावें॥*

तुकोबांनी एका अभंगात लोभी, आळशी, अविचारी,

खादाड इत्यादी दुर्गुण ज्याचे ठायी आहेत त्यांच्या जिण्याचा धिःक्कार केलेला आहे. तुकोबा म्हणतात :

*धिग जीणें ज्याचें बाईले आधीन।*
*पर-लोक मान नाही दोन्ही॥*
*धिग जीणें ज्याचें लोभावरी मन।*
*अतीत-पूजन घडे चि ना॥*
*धिग जीणें आळस निद्रा जया फार।*
*अ-मित आ-हार अघोरिया॥*
*धिग जीणें नाहीं विवेक वैराग्य।*
*झुरे मानालागी साधुपणा॥*
*तुका म्हणे धिग़ ऐसे झाले लोक।*
*निंदक वादक नरका जाती॥*

++

# मंबाजी

पुण्याजवळ चिंचवड नावाचं गाव आहे. तिथं मंबाजी नावाचा एक बुवा राहात होता. तो पुढे देहूला आला, आणि तिथंच मठ बांधून राहू लागला. मंबाजी हा ढोंगी बुवा होता. गळ्यात माळा, कपाळावर टिळा आणि डोक्यावर जटा जरी त्यानं वाढविल्या होत्या, तरी आचार आणि विचारानं अत्यंत मलीन होता. लोभ, स्वार्थ, राग, द्वेष, गर्व, मत्सर इत्यादी विकारांच्या वेटोळ्यातून सुटलेला नव्हता. बुवाबाजी हा त्यानं

धंदाच बनवलेला होता. भोळ्याभाबड्या लोकांना आपल्याभोवती जमवायचा आणि वैराग्याची बाष्फळ बडबड करायचा. अडल्या नडल्या लोकांना लुबाडायचा. थातूरमातूर करून फसवायचा. गरीब, भोळे लोक त्याच्या चलाखीला बळी पडायचे आणि भक्तीभावानं घरच्या मुलाबाळांच्या आणि गायवासरांच्या तोंडचा घास काढून त्याला नेऊन द्यायचे. दूध, दही, लोणी, तूप, नाना तऱ्हेची फळं, गोडधोड पक्वान्नं – मंबाजीची चंगळ चाललेली होती!

मंबाजीनं मठाभोवती मोठी जागाही व्यापली होती. या जागेत त्यानं फुलबाग केली होती. तुकोबांच्या देवळाला लागूनच ही बाग आणि मठ होता.

तुकोबा आपल्या विठ्ठल-रखुमाईच्या देवळात भजन-कीर्तन करू लागले; तेव्हा मात्र मंबाजीच्या मठाकडली गर्दी तुकोबांच्या देवळाकडं वळली. तुकोबांचा सत्त्वशील भाव, रसाळ वाणी, सुलभ कवित्व, निर्मळ मन, साधेपणा आणि शालीन-सज्जनता, या सद्‌गुणांमुळं लोकांच्या मनाचा ठाव तुकोबांनी अल्पावधीतच घेतला.

मंबाजीच्या मठातील श्रोत्यांची संख्या रोडावली. फुकट चालणारी चंगळ थंडावली. तुकोबांच्या लोकप्रियतेमुळे मंबाजीच्या तळपायाची आग मस्तकाला पोचली. तुकोबांचा द्वेष करीत तो दांभिक बुवा तुकोबांना वाट्टेल तशा अर्वाच्य शब्दात बोलू लागला. त्याच्यासारखेच चार टवाळ त्याच्याभोवती असत. चिलीम-गांजा ओढत, गावच्या कुटाळक्या करीत बसत. मंबाजी म्हणायचा, "त्या तुक्याला काय कळतंय? परमार्थ कळण्याएवढी

अक्कल त्याच्याजवळ आहे का? त्याला संसार धड करता येत नाही. बायका-पोरं उपाशी मरत आहेत. तिकडं याचं लक्ष नाही, आणि हा लागलाय लोकांना उपदेश करायला. आणि लोक तरी कसले? त्या खुळ्याच्या मागं लागलेत. तो एक मूर्ख आणि हे महामूर्ख!. . ."

"तर काय! त्या खुळ्याच्या मागं गावचे खुळे नाचतात काय, गातात काय, म्हणतात काय, अशानं काय देव भेटतो?"

कुटाळ मंडळी असे अकलेचे तारे तोडायचे. मंबाजी तुकोबावर सारखा जळफळत राहायचा. त्याचं काय करावं? आणि कसा काटा काढावा? याचा विचार करायचा.

एकदा जिजाबाईची मंगळाई म्हैस चालली होती. मंबाजीच्या बागेतली हिरवीगार झाडं तिला दिसली. तिनं ती ओरबाडून खाल्ली. झालं! मंबाजीला निमित्तच मिळालं. त्यानं म्हशीला आणि तुकोबाला शिव्यांची लाखोली तर वाहिलीच, पण तुकोबाच्या देवळाला प्रदक्षिणा घालण्याची वाट, जी बागेला लागून होती, ती मंबाजीनं बाभळीच्या काटेरी फऱ्यांनी बंद करून टाकली.

कीर्तनाची वेळ झाली, तेव्हा तुकोबा देवळात आले. देवाचं दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालू लागले, तर देवळाच्या मागं वाट बंद केलेली त्यांना दिसली. त्यांना नवल वाटलं! त्यांनी विचारलं, "वाट कोणी बंद केली?"

"मंबाजीबुवानं केली." एकानं सांगितलं.

तुकोबानं विचारलं, "कशासाठी?"

"त्यांना म्हणे लोकांच्या वर्दळीचा त्रास होतो. आपल्या म्हशीनंही

काल त्यांची फुलझाडं खाल्ली." दुसऱ्यानं सांगितलं.

तुकोबा म्हणाले, "म्हशीचा बंदोबस्त करू. पण लोकांनी देवाला प्रदक्षिणा घालायची नाही, हे कसं चालेल? एकाचा त्रास वाचवण्यासाठी अनेकांना ही अडचण कशासाठी?", तुकोबांनी पुढं होऊन ते बाभळीचे काटेरी फराटे बाजूला सारले आणि वाट मोकळी केली. प्रदक्षिणा घातली. देवळात आले. आणि नामस्मरणात तल्लीन होऊन गेले.

मंबाजीनं हे जेव्हा पाहिलं, तेव्हा तो संतापानं लाललाल झाला! अद्वातद्वा बोलत मठातून बाहेर आला. काटेरी फरा हातात घेऊन देवळात घुसला आणि तुकोबांना यथेच्छ बडवून काढलं. तुकोबांनी त्याला प्रतिकार तर केला नाहीच, पण त्याला उद्देशून एक अपशब्दही मुखावाटे उच्चारला नाही.

तुकोबांच्या अंगात ठिकठिकाणी बाभळीचे तीक्ष्ण काटे घुसले होते. रक्त वहात होते. वेदना होत होत्या. आणि तुकोबा अभंगवाणीनं विठ्ठलाला विनवीत होते, "देवा, बरे केलेस. माझ्या अंगी किती क्षमाशक्ती आहे, हे तरी पाहिलेस! देवा, मला क्रोधाच्या आहारी जाऊ दिले नाहीस. जसं संचितात होतं, तसं घडलं. पण देवा, माझी एवढी फजिती तरी का करतोस? मी चुकलो का रे? पण आता दुर्जनाची संगत पुरे झाली. तुझ्याशिवाय मी शरण तरी कोणाला जाऊ? या देहाचे तुकडे तुकडे जरी झाले, तरी देवा, मी तुझे पाय सोडणार नाही."

या प्रसंगी तुकोबांच्या मुखातून उमटलेली अभंगवाणी अशी होती

*न सोडीं न सोडीं न सोडीं।*

विठोबा चरण न सोडीं ॥
भलतें जड पडो भारी ।
जीवावरी आगोज ॥
शतखंड देह शस्त्राधारी ।
करितां परी न भीयें ॥
तुका म्हणे केली आधीं ।
दृढ बुद्धी सावध ॥

बरवें बरवें केले विठोबा बरवें ।
पाहोनि आंत क्षमा अंगी कांटीवरी मारविले ॥
शिव्या गाळी नीत नाहीं ।
बहु फार विटंबिले ॥
तुका म्हणे क्रोधा हातीं ।
सोडवुनि घेतलें रे ॥

पावलों पावलों ।
देवा पावलों रे ॥
बरवें संचित होतें तैसें जालें रे ।
आतां काय बोलो रे ॥
सोज्ज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे ।
तुका म्हणे करूनि वेगळा केलों रे ॥

कां होती कां होती ।
देवा एवढी फजीती ॥
मुळीं वर्म नसतों चुकलों ।
तो मी ऐसें चित्तीं ॥

*होणार होऊनि गेलें।*
*मिथ्या आतां खंती रे॥*
*तुका म्हणे पुरे आतां।*
*दुर्जनांची संगती रे॥*

*सोडवा सोडवा।*
*सोडवा हो अनंता॥*
*तुजविण ऐसा।*
*कोण दुजा प्राणदाता॥*
*कोणा लाज नेणां ऐसें।*
*आणिकां शरण आम्ही जातां॥*
*तुका म्हणे सखया।*
*माझ्या रखुमाईच्या कांता॥*

तुकोबा गात होते. मंबाजी फटके मारीत होता. गर्दी करून बघे नुसतेच बघत होते. मध्ये पडण्याची कोणीच हिंमत दाखवीत नव्हता. पण त्यातल्याच एका लहानग्या पोराला मात्र कळवळा आला आणि तो धावत-पळत तुकोबाच्या घरी गेला. जिजाऊला म्हणाला, "मावशी, तुकोबाला देवळात लई बडिवलंय." जिजाबाईनं घाबरून विचारलं, "कुणी रं?"
"मंबाजीनं."

ते ऐकताच जिजाबाईनं हातचं काम टाकलं. पदर खोचला. आणि तोंडाचा पट्टा सोडून ती देवळाकडं धावली. जिजाबाईच्या शिव्यांची लाखोली ऐकताच मंबाजी घाबरला आणि मठात पळून गेला. दार लावून बसला.

जिजाबाईनं तुकोबांना उठवून घरी नेलं. अंगातले काटे वेचून काढले. रक्त पुसून टाकले. जखमांना तेल-हळद लावली. कढत आंबिल प्यायला दिली. आणि अंगावर वाकळ घालून झोपवलं. इतकं सगळं करताना ती मंबाजीला शिव्या घालतच होती. तुकोबांना झोपवल्यावर ती मंबाजीचा समाचार घ्यायला निघाली. तुकोबा म्हणाले, "आवले, असं दुसऱ्याला वाईट-साईट बोलू नये. तू जाऊ नकोस. चुकणाराला माझा पांडुरंग क्षमा करतो." जिजाबाई चवताळून म्हणाली, "नाव घेऊ नका तुमच्या त्या काळतोंड्या पांडुरंगाचं. इतकं मारलं त्या गोसावड्यानं तवा कुठं झोपला व्हता होय तुमचा पांडुरंग? दीसरात तुमी त्याचं भजन करता, अन् त्यो मात्र तुमचा मार बघत गपगार उभा ऱ्हातो! कसला ह्यो देव?"

जिजाबाई तरातरा तणतणत मंबाजीच्या मठात गेली. मंबाजी दार लावून खोलीत लपून बसला होता. जिजाबाईनं जावून दारावर लाथा घातल्या आणि तोंडानं बख्खळ शिव्या दिल्या. जमलेल्या लोकांनाही ती म्हणाली, "एवढं मारलं या गोसावड्यानं माझ्या मालकाला आन् तुम्ही नुसतं बघत बसला व्हय रं! नेभळटांनो, लाज कशी वाटली नाही तुमाला?"

लोक चपापले आणि खाली मान घालून निघून गेले. जिजाबाई "ये बाहेर म्हणजे दावते तुला", असा मंबाजीला दम देऊन तणतणत निघून गेली.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी तुकोबा उठले. देवळात गेले. देवदर्शन घेतले आणि मंबाजीच्या मठात जाऊन झोपलेल्या मंबाजीचं अंग दाबू लागले. मंबाजी दचकून उठला. तुकोबांना

पाहून चकित झाला. म्हणाला, "तू?"

तुकोबा शांतपणानं म्हणाले, "होय. मीच. काल मला मारताना तुम्हाला फार फार कष्ट पडले असतील, हात दुखत असतील, म्हणून अंग दाबून द्यावं यासाठी आलोय मी." मंबाजी शरमून गेला.

दिवस-मास उलटले. तुकोबाची कीर्ति वाऱ्यासारखी सगळीकडं पसरत होती. कीर्तनाला गर्दी लोटत होती. मंबाजी मूळचाच दुष्ट-मत्सरी स्वभावाचा माणूस होता. त्याला तुकोबाचं हे मोठंपण सहन होत नव्हतं. तो द्वेषानं जळफळत होता. त्याची दुष्ट बुद्धी तुकोबांना बदनाम करायला टपलेली होती. त्यानं मग एक नीच डाव टाकला.

गावात एक बाई होती. ती फार फार नटायची – मुरडायची. साजश्रृंगार करून गावभर भटकायची. मंबाजीकडंही यायची. तिचं नाव होतं मंजिरी. ह्या नखरेल नटव्या मंजिरीचा उपयोग करून घ्यायचा आणि तुकोबांना जाळ्यात पकडायचं, असा बेत त्यानं रचला. त्याच्या ह्या कुटील बेताला मंजिरीनंही साथ द्यायचं कबूल केलं.

एके दिवशी एरवीपेक्षा जास्तीच नटून-थटून मंजिरी तुकोबांच्याकडं गेली. संध्याकाळची वेळ होती. तुकोबा एकटेच भजन म्हणत बसले होते. भजनात दंग झाले होते. मुखानं म्हणत होते :

*राजस सुकुमार मदनाचा पुतळा।*
*रविशशिकळा लोपलिया॥*
*कस्तुरीमळवट चंदनाची उटी।*

*रुळे माळ कंठी वैजयंती॥*
*मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें।*
*सुखाचे ओतले सकळ ही॥*
*कासे सोनसळा पांघरे पाटोळा।*
*घननीळ सांवळा बाइयानो॥*
*सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा।*
*तुका म्हणे जीवा धीर नाहीं॥*

पैंजणाचा छुमछुमाट जवळ आला. तुकोबांनी डोळे उघडून बघितले. मदनाच्या पुतळीसारखीच मंजिरी शेजारी पाहून त्यांना नवल वाटलं! त्यांनी विचारलं, "आपण कोण आहात? इथं कोणाकडं आला आहात?"

लाजत-मुरकत मंजिरी म्हणाली, "माझं नाव मंजिरी. तुमच्याकडंच आले आहे. मला तुम्ही फार फार आवडता. तुमचं भजनसुद्धा मला फार फार आवडतं."

तुकोबा हसून म्हणाले, "मी आवडावा असं माझ्यात काही नाही. वेडाबिद्रा बावळट माणूस मी. पण भजन आवडतं म्हणालात, तो पांडुरंग मात्र सगळ्यांना आवडावा असाच आहे. काय त्याचं रूप वर्णावं? अहाहा!

*सुंदर ते ध्यान उभे विटेवरी।*
*कर कटावरी ठेवूनियां॥*
*तुलसीहार गळां कासे पीतांबर।*
*आवडे निरंतर तें चि रुप॥*
*मकरकुंडलें तळपती श्रवणीं।*
*कंठी कौस्तुभमणि विराजित॥*

*तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख।*
*पाहीन श्रीमुख आवडीनें॥*

मंजिरीनं विचारलं, "मी आवडले ना तुम्हाला?"
तुकोबा म्हणाले, "पांडुरंगानंच ही सगळी सृष्टी घडवलेली आहे. माणसं म्हणजे त्यानं घडवलेल्या मूर्तीच! विठ्ठलाचं सगळं करणं मला आवडतं. तशा तुम्हीही आवडता. माझी आईच आज लहान होऊन माझ्या पुढं आपल्या लेकराला पहायला आली आहे, असंच मला वाटतं आहे. ये आई! बैस."

मंजिरी गांगरून गेली. गोंधळली. पण आपल्या कामगिरीची आठवण येताच तिनं स्वतःला सावरलं. तुकोबाशी सलगीनं लगट करीत म्हणाली, "तसं नाही हो, मी आई म्हणून आले नाही. बाई म्हणून आले आहे."

मग तुकोबाही गडबडले! गंभीर झाले! म्हणाले, "आई, असं काय बोलतेस तू! अगं, रूख्मिणीमातेसारखीच जगन्माता तू. मी तुझं लेकरू. आवली माझी धर्मपत्नी. तिच्याशिवाय सगळ्या स्त्रिया मला मातेसारख्याच नाहीत काय? आई, आता तू आपल्या घरी जा. उगाच कष्ट घेऊ नकोस :

*पराविया नारी रखुमाईसमान।*
*हे गेले नेमून ठायींचें चि॥*
*जाई वो तूं माते न करीं सायास।*
*आम्ही विष्णुदास नव्हों तैसे॥*
*न साहावें मज तुझें हें पतन।*
*नको हे वचन दुष्ट वदों॥*

*तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार।*
*तरी काय नर थोडे जाले॥*

तुकोबा पुढे म्हणाले, "आई, अगं आम्ही विष्णुदास तसल्या मार्गातले नाहीत. आई, तुझं हे पतन मला पाहवत नाही. पुन्हा असले शब्द मुखावाटे उच्चारू नकोस. अगं आई, तुला भ्रतारच हवा असेल, तर इतर नर काय कमी आहेत? जा तू, आई जा!"

मंजिरी शरमून, खाली मान घालून निघून गेली.

मंबाजीचा हा बारही फुसका ठरला.

++

# उदकी राखिले कागद

तुकोबांचा नावलौकिक वाढत होता. आणि मंबाजी द्वेष-मत्सरानं जळत होता. दोन्ही बार फुसके निघाल्यावर त्यानं मग रामेश्वरभटाकडं धाव घेतली. रामेश्वरभट्ट पुण्याच्या परिसरात आठ-नऊ मैलांवर असलेल्या वाघोली नावाच्या गावात राहात असे. हा भट मोठा कर्मठ होता. सकाळ-संध्याकाळ याची स्नान-संध्या चालायची. ब्रम्हयज्ञ करायचा. हा विद्वान दशग्रंथी ब्राह्मण होता. याच्या पांडित्याची कीर्ति दूरवर पोचलेली होती. वेदांवरचा याचा अधिकार विद्वत्‌मान्य होता. मंबाजीनं रामेश्वर-भटांकडं जाऊन तुकोबांच्या विरुद्ध गाऱ्हाणं घातलं. म्हणाला, "अब्रम्हण्यम्! अब्रम्हण्यम्! घात झाला! प्रलय झाला. शिव-शिव-शिव!"

रामेश्वरभटांनी विचारले, "अहो, काय झालं ? कसला प्रलय ?"

"आमच्या देहूचा तो तुक्या वाणी कीर्तनं करायला लागलाय. आणि त्याची कीर्तनं ऐकायला लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमायला लागलेल्या आहेत. कीर्तनात हा तुक्या नाचतो काय, गातो काय ? . . .छे ! छे ! छे ! कहर झाला."

"अहो मंबाजी, मग यात वाईट ते काय झालं ?"

"काय झालं. अहो, तो तुम्हा वेदशास्त्रसंपन्न पंडिताला बैल म्हणतो ?"

"बैल म्हणतो ?"

"हो हो, ओझी वाहाणारी बैलं म्हणतो."

"पण कशासाठी ?"

"अहो, त्याचा दावा असा आहे की वेदांचा अर्थ आपल्यालाच कळतो आणि तुमच्यासारख्या वेदमूर्तींनी व्यर्थ बैलासारखं ओझं वहावं."

"असं म्हणतो तुक्या ?"

"नुसतं म्हणतो नाही. अभंग करून गातो देखील. त्यानं अभंगात म्हटलंय, 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ! येरांनी वहावा भार माथा ||' आता बोला ?"

"मंबाजी, मलाच बोला म्हणतां ? तुक्या एवढं म्हणतो आणि तुम्ही नुसतं ऐकतां ? अहो, तुम्ही त्याला कीर्तनं करायला आणि असले अभंग रचायला बंदी का नाही घातली. चला. मीच येतो देहूला. बघूया त्या तुक्याचे थेर कसे चालतात ते !"

रामेश्वरभट पुण्याला आले. सुभेदाराला भेटले आणि गाव-

पाटलाला पत्र लिहायला लावलं. त्या पत्रात सुभेदाराकडून त्यांनी असं लिहिवून घेतलं की, 'तुक्या कुणब्याला कवित्व करण्याचा अधिकार नाही. तो शूद्र आहे. शूद्रानं आपल्या पायरीनं राहावं. वेदावर बोलण्याचा किंवा लिहिण्याचा त्यांना अधिकार नाही. तुक्या कुणब्यानं ह्या अधिकाराचं उल्लंघन केलेलं आहे. सबब त्याला गावच्या हद्दीबाहेर हाकलून द्यावं. कवित्व करायला बंदी घालावी आणि आजवर जे कवित्व केलेलं आहे त्याच्या वह्या इंद्रायणीच्या डोहात बुडवून टाकायला लावाव्यात !'

सुभेदाराचं पत्र मिळताच देहूगावच्या पाटलानं तुकोबांना चावडीवर बोलावून घेतलं आणि सुभेदाराचं आज्ञापत्र वाचून दाखवलं.

ते आज्ञापत्र ऐकून तुकोबांना फार फार दुःख झालं. ते फार फार कष्टी झाले. संसार धड करता आला नाही म्हणून लोक आधीच निंदा करत होते, आता परमार्थाचीही टिंगल-टवाळी होऊ लागली होती. तुकोबा उदास-खिन्न बनले. गावपाटलापुढं हात जोडून म्हणाले, "मी आता काय करू ?" पाटील तोऱ्यात म्हणाला, "ऐकलीस ना आज्ञा. मग पुन्हा वर काय विचारतोस ? गाव सोडून चालता हो. अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडवून टाक."

तुकोबांनी नम्रपणानं विचारलं, "पण कशासाठी ?"

"तुला कवित्व करण्याचा अधिकार नाही म्हणून."

तुकोबा लीनपणानं म्हणाले, "अहो पाटील, मी कसला कवी आणि कसलं माझं कवित्व ? चार अक्षरं लिहिली आणि गायिली, ती का माझी आहेत ? मी एक पामर. मी कसलं कवित्व

करणार ?"

> *"काय म्या पामरें बोलावी उत्तरें।*
> *परि त्या विश्वभरें बोलविले॥*
> *साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी।*
> *बोलविता धनी वेगळाची॥"*

पाटील रागावला. तुकोबांच्या अंगावर खेकसला, "तुक्या हे तुझं ढोंग बास कर. करून सवरून देवाच्या नावावर टाकतोस आणि मोकळा होतोस. पण यापुढं हे थेर चालायचे नाहीत. जा. नीघ येथून."

तुकोबा विषण्ण मनानं घरी आले. अभंगाच्या वह्या गोळा करून बांधू लागले. त्यांची दुःखीकष्टी मुद्रा पाहून जिजाबाईनं विचारलं, "काय झालं हो ? असं तोंड का उतरलंय तुमचं ? कोणी बोललं का ? पाटील काय म्हणाला ?"

तुकोबांनी सांगितलं, "आवले, सुभेदाराची आज्ञा पाटलांनी सांगितली. गाव सोडून जायला सांगितलं आहे. यापुढं मी कीर्तन करायचं नाही, अभंग लिहायचे नाहीत. म्हणायचे नाही. . . काय करावं ?"

> *काय बा करावें कोणाकडे जावें।*
> *गावात रहावे कवण्या परी॥*
> *कोपला पाटील गांवांतले लोक।*
> *आता मज भीक कोण घाली॥*
> *आता येणे चवीं सांडिली म्हणती।*
> *निवाडा करीती दिवाणांत॥*

*भल्या लोकी यांस सांगितला मात।*
*केला माझा घात दुर्बळाचा॥*

जिजाबाईनं गाव सोडण्याच्या आज्ञेविरुद्ध बरंच तोंड केलं. म्हणाली, "आमच्या आठ पिढ्या या देहूत नांदल्या आहेत. आम्ही का म्हणून गाव सोडावं ?"

तुकोबा शांतपणानं म्हणाले, "आवले, सत्तेपुढं शहाणपण चालत नसतं. चल. पांडुरंग नेईल तिकडं जातो. ह्या वह्या इंद्रायणीमातेच्या ओटीत टाकतो."

तुकोबांनी बांधून ठेवलेल्या वह्यांचं गाठोडं डोक्यावर घेतलं आणि ते निघाले. जिजाबाईनं लगबगीनं पुढं जाऊन त्यांची वाट अडवली. म्हणाली, "अहो, एवढं भाराभर लिहिलेलं पाण्यात बुडवणार ? तुम्हाला काय येडबीड तर लागलं नाही ना ?"

तुकोबा म्हणाले, "ज्यानं वेड लावलं त्यानंच हे लिहून घेतलं. तोच आता लिहिलेलं परत मागतोय. त्याचं त्याला देऊन टाकतो. तोच बुडवील आणि सांभाळील !"

जिजाबाई म्हणाली, "हे बघा, मला हे तुमचं बोलणं काही सुद्धा समजत नाही. पण तुम्हाला मी वह्या बुडवू देणार नाही."

"आवले, असा हट्ट धरू नकोस. माझा शब्द खोटा पाडू नकोस. अग मी जे लिहिलं, त्यात माझं काही नाही. मी आपलं धन्याचं भांडार फोडलं आणि त्याचाच माल वाहिला. मी ओझं वाहाणारा भारवाही. सोड माझी वाट. जाऊ दे मला."

तुकोबांनी आवलीचा हात बाजूला केला आणि ते इंद्रायणीच्या डोहाकडे निघाले. लोकांची गर्दीही त्यांच्या मागोमाग निघाली. गर्दीत जसे तुकोबांचे निंदक होते, तसे चाहते-भक्तही

होते. निंदक आसुरी आनंदानं, कुत्सितपणानं हासत होते, तर चाहते-भक्त हळहळत, तळमळत होते. दुःखी-कष्टी झाले होते.

तुकोबा इंद्रायणीच्या पात्रात उतरले. वह्यांचे गाठोडे इंद्रायणीमातेच्या ओटीत अर्पण करून हात जोडून म्हणाले, "आई, हे तुझं धन तू सांभाळ !"

तुकोबा पात्रातून वर आले आणि तिथं जवळच एका झाडाखाली बसले. देवाला म्हणाले, "विठ्ठला, तुझं धन तुला देऊन मोकळा झालो. आता तू दिलेला हा देह सुद्धा घेऊन टाक आणि मुक्त कर."

विठ्ठलाचे नामस्मरण करीत तुकोबा बसून राहिले. थोड्यावेळानं जिजाबाई कालवण-भाकरी घेऊन आली. फडकं सोडून भाकरी पुढं करीत म्हणाली, "घ्या. लई येळ झाला. जेवा आता."

तुकोबा म्हणाले, "आवले, आता जेवणखाण नाही. भाकरी परत घेऊन जा. पोरांना जेवायला घाल, तूही जेवून घे."

जिजाबाईला हे ऐकून धक्काच बसला ! ती म्हणाली, "जेवणखाण बंद ? अन्नच घेणार नाही ?"

"नाही. अभंगाच्या वह्या इंद्रायणीमातेला दिल्या, तसाच हा देह पांडुरंगाला देऊन टाकतो. माझा उपवास सुरू झाला आहे. तू आग्रह करू नकोस. घरी जा."

तुकोबांची वाणी शांत होती, तरी तिच्यात एक दृढ निर्धारही होता !

दिवसांमागून दिवस चालले. उपवासामुळे तुकोबा क्षीण होत गेले. बघता बघता तेरा दिवस झाले. तुकोबांनी विठ्ठलाला साकडेच घातले होते. ते म्हणाले

*तेरा दिवस जाले निश्चक्र करितां।*
*न पवसी अनंता मायबापा॥*
*पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी।*
*काय हृषीकेशी जालें तुज॥*
*तुजवरी आतां प्राण मी त्यजीन।*
*हत्या मी घालीन पांडुरंगा॥*
*फार विठाबाई धरिली तुझी आस।*
*करीन जीवा नास पांडुरंगा॥*
*तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण।*
*प्राण हा सांडीन चंद्रभागे॥*

तुकोबांनी अन्नपाणी वर्ज्य केल्यावर जिजाबाई आणि मुलांनीही घास घेतला नाही. जिजाबाई आपल्या दोन लेकरांसह तिथंच येऊन राहिली.

चौदावा दिवस उजाडला आणि चमत्कार घडला ! कोणीतरी गोड आणि मंजुळ स्वरात हाक दिली, ''तुकारामा, डोळे उघड. मी आलो आहे. अरे, तेरा दिवस होऊन गेले. मी सुद्धा अन्नपाणी घेतलेलं नाही. किती दिवस तू मला उपाशी ठेवणार आहेस ? मला फार फार भूक लागली आहे. उपवासाची समाप्ती करू या. पोरंबाळंही उपाशी आहेत. चल, डोळे उघड. आणि बघ, तुझ्या अभंगाच्या वह्या बुडालेल्या नाहीत. इंद्रायणीच्या पाण्यावर तरंगत आहेत. त्या कोरड्या ठणठणीत आहेत !''

तुकोबांनी डोळे उघडले. पाहिले. तर समोर विठ्ठलाची बालमूर्ती तेजानं तळपत असलेली त्यांना दिसली. डोहाकडं नजर टाकली, तर खरोखरच वह्या तरंगत असल्याचं अपूर्व दृश्य

दिसलं. तुकोबांनी चटकन उठून देवाच्यापायी दंडवत घातला. देवांनी त्यांच्या पाठीवरून मायेनं हात फिरवला. तुकोबा उठले आणि देवाची क्षमा मागत म्हणाले :

*थोर अन्याय केला तुझा अंत म्या पाहिला।*
*जनाचिया बोलासाठी चित्त क्षोमविले॥*
*भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन।*
*झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों॥*
*अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें।*
*योगक्षेम पुढें तुज करणें लागेल॥*
*उदकी राखिले कागद चुकविला जनवाद।*
*तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें॥*

देव अंतर्धान पावले आणि त्याचवेळी देहूत गंगाराम मवाळ ह्या तुकोबांच्या एका भक्ताला दृष्टांत झाला. गंगाराम खडबडून उठला. तुकोबांच्या कीर्तनाला येणाऱ्या भक्तमंडळींना हाक देऊन म्हणाला, "अरे, उठा उठा ! तुकोबांच्या वह्या इंद्रायणीनं कोरड्या परत दिल्या ! चला, पळा लवकर !"

"गंगारामाच्या मागोमाग लोक खरेच पळत सुटले. बघता बघता इंद्रायणीच्या काठी ही गर्दी जमली ! तुकोबा इंद्रायणीच्या पाण्यात उतरले. वह्या तरंगत त्यांच्याजवळ गेल्या. तुकोबांनी दोन्ही हातांनी त्या उचलल्या आणि त्यावर मस्तक ठेवले. कोरड्या वह्या घेऊन काठावर आले. लोकसाक्षीने त्यांना त्यांच्या वह्या इंद्रायणीमातेनं जशाच्या तशा परत केल्या होत्या. तुकोबांनी विठ्ठलाचे भजन आरंभिले. लोकांनी टाळ-मृदंग आणले.

विठ्ठलाचा जयजयकार केला आणि वह्यांची ती दिंडी मिरवत-मिरवत तुकोबांच्या घराकडं निघाली ! लोक आनंदानं बेहोष झाले होते ! तुकोबाही त्यांच्याबरोबर नाचत-डोलत होते. त्यांच्या अंगात एक नवीनच बळ संचारले होते. ते आनंद-कल्लोळात बुडून अभंग गात होते :

*विठ्ठल माझा जीव विठ्ठल माझा भाव।*
*कुळधर्म देव विठ्ठल माझा॥*
*विठ्ठल माझा गुरु विठ्ठल माझा तारुं।*
*उतरील पारू भवनदीचा॥*
*विठ्ठल माझी माता विठ्ठल माझा पिता।*
*विठ्ठल चुलता बहिणी बंधु॥*
*विठ्ठल हे जन विठ्ठल माझे मन।*
*सोयरा सज्जन विठ्ठल माझा॥*
*तुका म्हणे माझा विठ्ठल विसावा।*
*नश्वरित गावा जाइन त्याच्या॥*

तुकोबा परत घरी आले. ग्रामस्थांनी त्यांचा सन्मान केला. तुकोबांची पात्रता त्यांना आता कळून आली होती. परंतु रामेश्वरभटांसारख्या अहंकारी पंडिताला मात्र ती अजूनही आकलन झालेली नव्हती किंवा झाली असल्यास स्वतःकडे लहानपण घेऊन तुकोबांना मोठेपण देण्यास अहंकारी मनाचा ताठा आड येत होता.

एकदा रामेश्वरभट पुण्याला चालले होते. जाताना वाटेत त्यांना एक तळे लागले. ते तळे होते अनगडशहा नावाच्या एका

फकिराचे. रामेश्वरभटांनी त्या तळ्यात स्नान केले याचा संताप फकिराला झाला. कारण त्याच्यादृष्टीने रामेश्वरभट म्हणजे 'काफर'. महापापी! फकिराने त्यांना शाप दिला, ''तुझे अंग होरपळून निघेल !''

फकिराच्या या शापाने रामेश्वरभटाच्या अंगाचा भडका उडाला. दाह होऊ लागला. कसल्याच उपायाने अंगाची आग थांबेना; तेव्हा तो आळंदीला गेला. तिथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीजवळ जाऊन प्रार्थना केली. त्यावेळी रामेश्वरभटाला असा दृष्टांत झाला की, 'तू देहूला तुकोबांच्याकडे जाऊन त्यांची क्षमा माग !'

परंतु दृष्टांत होऊन देखील रामेश्वरभटाचा अहंकार काही निवळला नाही. तुकोबांना शरण जाणं आणि क्षमायाचना करणं, यात त्याला फारच कमीपणा वाटला. पण अंगाचा दाह तर होतच होता. म्हणून त्याने आपल्या एका शिष्याला देहूला तुकोबांकडे पाठविले.

तुकोबांनी एक अभंग लिहून रामेश्वरभटाकडे धाडला :

*चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती।*
*व्याघ्र हे न खाती सर्प तया॥*
*विष ते अमृत आघात तें हित।*
*अकर्तव्य नीत होय त्यासी॥*
*दुःख ते देईल सर्व सुख फळ।*
*होतील शीतळ अग्निज्वाळा॥*
*आवडेल जीवां जीवाचिये परी।*

*सकळां अंतरी एक भाव।।*
*तुका म्हणे कृपा केली नारायणें।*
*जाणिजेतें येणें अनुभवें।।*

आख्यायिका अशी आहे की, रामेश्वरभटाने तुकोबांच्या अभंगाचे वाचन-मनन-चिंतन केल्यावर त्याच्या अंगाचा दाह शांत-शमन झाला !

रामेश्वरभटांप्रमाणेच सालोमालो नावाचा आणखी एक तुकोबांचा द्वेषी होता. तो तुकोबांची आपल्या भोवतीच्या टवाळांमध्ये बसून भरपूर निंदा-नालस्ती तर करायचाच, पण कीर्तन करताना तो तुकोबांचे अभंग हे आपलेच म्हणून गायचा. अभंगाच्या शेवटी मात्र 'तुका म्हणे' या शब्दांच्याऐवजी 'सालोमालो म्हणे' असे शब्द घुसडून द्यायचा. शिवाय लोकांना तो असेही सांगायचा की, हा तुक्या चोर आहे. माझे अभंग चोरतो आणि 'तुका म्हणे' अशा नावाने आपलेच अभंग आहेत, अशी प्रौढी मिरवितो.

तुकोबांच्या कानी अनेकांनी ही वार्ता घातली. सुरुवातीला तुकोबांनी तिकडे दुर्लक्ष केले. पण मग नंतर हा प्रकार जेव्हा जास्तच वाढू लागला, तेव्हा त्यांनी या घटनांना उद्देशून काही अभंग केले.

*नाही घाटावे लागत।*
*एका सितें कळे भात।।*
*क्षीर निवडतें पाणी।*
*चोंची हंसाचिये आणी।।*

*आंगडे फाडुनि घोंगडें करी।*
*अवकळा तये परी॥*
*तुका म्हणे कण।*
*भुसी निवडे कैचा सीण॥*

*सालोमालो हरिचे दास।*
*म्हणवून केला अवघा नास॥*
*अवघें वचमंगळ केलें।*
*म्हणती एकांचे आपुलें॥*
*मोडूनि संताची वचनें।*
*करिती आपणां भूषणें॥*
*तुका म्हणे कवी।*
*जनामधी रूढ दावी॥*

++

# तुकोबांचा पत्रव्यवहार

तुकोबांनी नामदेव-ज्ञानदेव आदी संतांच्याप्रमाणे तीर्थयात्रा केल्या नाहीत. देहू – देहूचा परिसर आणि पंढरपूर या खेरीज ते कोठे गेले नाहीत.

एकदा देहूमधील काही मंडळी काशीयात्रेला चालली होती. तुकोबांच्या भजन-कीर्तनाने त्यांच्या मनी भक्तीभाव फुललेला होता. तेव्हा त्यांना स्वाभाविकपणेच असे वाटले की, तुकोबांनी-देखील आपल्याबरोबर यावे. म्हणून त्यांनी तुकोबांना तशी

विनंती केली. परंतु अशा तीर्थयात्रेकडे पाहाण्याची तुकोबांची दृष्टी वेगळीच होती. त्यांनी एका अभंगात म्हटले आहे:

*तीर्थांचे जे मूळ व्रतांचे जें फळ।*
*ब्रह्म ते केवळ पंढरिये॥*
*तें आम्ही देखिलें आपुल्या नयनी।*
*फिटली पारणी डोळियांची॥*
*जीवांचे जीवन सुखाचें सेजार।*
*उभे कटी कर ठेवूनियां॥*
*जनाचा जनिता कृपेचा सागर।*
*दीना लोभापर दुष्टांकाळ॥*
*सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानी।*
*आकार निर्गुणीं ते चि असे॥*
*तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडले।*
*आम्हां सापडले गीतीं गातां॥*

तुकोबा काशीयात्रेला गेले नाहीत. तथापि, अशा यात्रांचेही महत्त्व ते जाणत होतेच. अशा गोष्टींकडे ते केवळ आध्यात्मिक दृष्टीनेच केवळ पाहात होते. त्यांनी यात्रेला येण्यास नकार दिला, परंतु त्या मंडळींच्या जवळच काशीतील भागिरथी नदी आणि श्रीविश्वनाथ यांना पुढीलप्रमाणे दोन पत्रं पाठविली होती :

*परिसें वो माते माझी विनवणी।*
*मस्तक चरणीं ठेवीतसें॥*
*भागीरथी महादेव निवारणी।*
*सकळां स्वामिणी तीर्थांचिये॥*

*जीता भुक्ति मोक्ष मरणे तुझ्या तिरीं।*
*अहिक्यपरत्रीं सुखरूप॥*
*तुका विष्णुदास संतांचे पोसणें।*
*वाक्पुष्प तेणे पाठविले॥*

*तुम्ही विश्वनाथ। दीनरंक मी अनाथ॥*
*कृपा कराल ते थोडी। पाया पडिलों वराडी॥*
*काय उणे तुम्हापाशीं। मी तो अल्पे चि संतोषी॥*
*तुका म्हणे देवा। कांहीं भातुकें पाठवा॥*

एकदा एका ब्राह्मणाला आपण विद्वान पंडित व्हावे असे वाटले. आता असे पंडित व्हायचे तर वाचन-मनन-चिंतन अशी तपःसाधना केली पाहिजे. गुरुमुखातून समजावून घेतले पाहिजे. अखंड अध्ययन केले पाहिजे. परंतु त्या ब्राह्मणाला असले परिश्रम न करताच पंडित व्हायचे होते. तो उठला आणि पंढरपूरला गेला आणि तिथे विठोबाजवळ धरणे धरून बसला. म्हणू लागला, "देवा, मला पंडित करा. त्याशिवाय तुमचे पाय सोडणार नाही."

त्या ब्राह्मणाला मग असा दृष्टांत झाला की, "तू आळंदीस जा!"

ब्राह्मण उठला. आळंदीस गेला. तिथे श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीजवळ धरणे धरून बसला. तेव्हा तिथेही त्याला असा दृष्टांत झाला की, "देहूस तुकाराममहाराजांकडे जा!"

ब्राह्मण उठला आणि देहूला तुकोबांच्याकडे आला. ह्याप्रसंगी तुकोबांनी काही अभंग रचून विठ्ठलाची विनवणी केली.

श्रीज्ञानदेवांनी केलेली आज्ञा आणि त्यानुसार ब्राह्मणास केलेला उपदेश या अभंगात आलेला आहे. तुकोबा म्हणतात, "अरे विश्वंभरा, तू सर्वसत्ताधीश आहेस. सर्व काही जाणणारा आहेस. करुणावंत आहेस. विश्वाचे पालन करणारा आहेस. मी तर खराखुरा दाससुद्धा नाही. पण माझ्या भक्तीचा उगाचच डांगोरा झालेला आहे. माझ्या गाठी एवढे पुण्य नाही. तुला हे ठाऊक आहे. मग असे असताना माझ्या मागे ही नसती उपाधी का म्हणून लावून दिली आहेस?"

*काय मी जाणता।*
*तुम्हाहूनि अनंता॥*
*जो हा करूं अतिशय।*
*कां तुम्हां दया नये॥*
*काय तुज नाही कृपा।*
*विश्वाचिंया मायबापा॥*
*तुका म्हणे वाणी।*
*माझे वदे तुम्हांहुनि॥*

श्रीज्ञानेश्वरांनाही तुकोबांनी म्हटले आहे की, "अहो, आपल्या ज्ञानेश्वरीत काय उणे आहे, म्हणून माझ्याकडे हे धरणे पाठविले? अहो, आपल्या चरणावर मस्तक ठेवून मी आपला उतराई झालो आहे. मी तर साधा तराळ आहे. दिलेलं खावं आणि प्रसंगी तुमचंच वचन बोलावं, असा मी. माझ्यावर हा आपण फारच भरिभार घातलेला आहे."

परंतु ज्ञानदेवांची आज्ञा प्रमाण मानून तुकोबांनी त्या

ब्राह्मणास उपदेश करताना म्हटले आहे की, ''अरे भल्या माणसा, उगाच ग्रंथांच्या भरीला पडू नकोस. त्यापेक्षा एकच एक व्रत घे, आणि ते म्हणजे स्वतःचा देहभाव विसरून देवाचेच नामस्मरण करीत जा! अरे, साध्यासाठी अनेक साधने जवळ केलीस, तरी शेवटी गर्भवास चुकत नाहीच. मोक्ष उधार आहे आणि जरा-व्याधी रोकडी आहे, हे लक्षात घे! आणि म्हणून नामस्मरणासाठी उडी घे! पांडुरंग तुला पैलतीराला पोचवील."

आणखी एका अभंगात तुकोबा त्या ब्राह्मणाला सांगतात :

*नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें।*
*आणूनि निराळें द्यावें हातीं॥*
*इंद्रियांचा जय साधुनियां मन।*
*निर्विषय कारण असे तेथे॥*
*उपास पारणीं अक्षरांची आटी।*
*सत्कर्मा शेवटीं असे फळ॥*
*आदरें सकल्प वारीं अतिशय।*
*सहज तें काय दुःख जाण॥*
*स्वप्नींच्या घायें विवळसी वांयां।*
*रडे रडतियासवें मिथ्या॥*
*तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं।*
*शरण देवासीं जाय वेगीं॥*

तुकोबांनी आणखीही काही अभंगातून त्या ब्राह्मणाला उपदेश केला होता. ते उपदेशाचे अभंग आणि श्रीफल देऊन तुकोबांनी त्याला उपकृत केले होते. पण त्या अहंकारी ब्राह्मणाला

तुकोबांचा उपदेश पटला नाही. त्याने ते अभंग आणि श्रीफल तिथेच टाकले आणि निघून गेला. तुकोबांनी हा प्रकार ज्ञानेश्वरांना अभंगांमधून कळवला. तुकोबा म्हणतात :

*ज्ञानियांचा गुरु राजा महाराव।*
*म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां।।*
*मज पामरा हें काय थोरपण।*
*पायींची वाहाण पायीं बरी।।*
*ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळगणे।*
*इतर तुळणे काय पुरे।।*
*तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली।*
*म्हणोनि ठेविली पायीं डोई।।*

ज्ञानेश्वरांची अशी महती गाइल्यावर तुकोबा ज्ञानदेवांना सांगतात :

*तुम्ही येथें पाठविला धरणेकरी।*
*त्याची जाली परी आइका ते।।*
*आतां काय पुढें वाढवुनि विस्तार।*
*जाला समाचार आइका तो।।*
*देवाचे उचित एकादश अभंग।*
*फहाफळ त्याग करूनि गेला।।*
*तुका म्हणे सेवा समर्पूनि पायीं।*
*जालों उतराई ठावें असो।।*

देहूतील काही वारकरी पंढरीला निघाले होते. तुकोबांनाही जाण्याची इच्छा होती, पण त्यांना वाटले की, विठ्ठलाने

बोलावल्याशिवाय आपण जाऊ नये. पण विठ्ठल-दर्शनाची उत्कंठा अमाप होतीच! मग त्यांनी विठ्ठलाला वारकऱ्यांच्या हाती एक पत्र दिले आणि विठ्ठलासाठी तोंडी निरोपही दिला. वारकरी पंढरीला गेले. ते परत येईपर्यंतच्या काळात तुकोबांच्या अंतःकरणात अगदी कालवाकालव चालली होती. शेवटी ते एकदाचे आले. तुकोबांना अवर्णनीय आनंद झाला! हा सगळा प्रसंग तुकोबांनी काही अभंगांतून सांगितलेला आहे. पत्र लिहिण्यापूर्वी त्यांच्या मनात असा विचार घोळत होता :

*कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात।*
*चाल तुज पंढरीनाथ बोलावितो॥*
*मग मी न धरीं आस मागील बोभाट।*
*वेगीं धरिन वाट माहेराची॥*
*निरांजलें चित्त करितें तळमळ।*
*केधवां देखती मूळ आलें डोळे॥*
*तुका म्हणे कई भाग्याची उजरी।*
*होईल पंढरी देखावया॥*

` तुकोबांनी वारकऱ्यांच्या हाती लिहिलेल्या पत्रातील पहिलेच अभंग असे होते :

*कां माझा विसर पडिला मायबापा।*
*सांडियेली कृपा कोण्या गुणें॥*
*कैसा कंठूनियां राहों संवसार।*
*काय एक धीर देऊं मना॥*
*नाही निरोपाची पावली वारता।*

*करावी ते चिंता ऐसी कांहीं॥*
*तुका म्हणे एक वेचुनि वचन।*
*नाहीं समाधान केलें माझें॥*

*कांहीं माझे कळों आले गुणदोष।*
*म्हणऊनि उदास धरिलें ऐसें॥*
*नाही तरी येथें न घडे अनुचित।*
*नाहीं ऐसी रीत तया घरीं॥*
*कळावें तें मना आपुलिया सवें।*
*ठायींचें हे घ्यावें विचारूनि॥*
*तुका म्हणे मज अव्हेरिलें देवें।*
*माझिया कर्तव्यें बुद्धीचिया॥*

असे पत्र पाठविल्यावर तुकोबा वारकऱ्यांची परत येण्याची वाट पाहात बसले :

*येती वारकरी।*
*वाट पाहातो तोंवरी॥*
*घालूनिया दंडवत।*
*पुसेन निरोपाची मात॥*
*पत्र हातीं दिलें।*
*जया जेथें पाठविलें॥*
*तुका म्हणे येती।*
*जाइन सामोरा पुढती॥*

तुकोबांनी श्रीविठ्ठलाला पत्राबरोबरच वारकऱ्यांजवळच तोंडी निरोपही दिला होता. ते त्यांना म्हणाले होते की, "आपण

पंढरीला चालला आहात तर वैकुंठनायकाला माझे क्षेम सांगा. 'अनाथांचा नाथ' असे त्याचे वर्णन आहे. तर त्यास म्हणावे, या दीनाला फार गांजू नकोस. कामक्रोधादी श्वापदांनी आणि मायेच्या भुजंग-सर्पांनी चहूकडून वेढलो आहे. त्यांच्या जाळ्यात सापडलो आहे. मृगजळाची नदी बुडवीतही नाही आणि तारीतही नाही. तुका म्हणतो, तुम्हीच जर असे माझ्याविषयी उदास राहिलात, तर आधारासाठी कोणाकडे पाहू?

"हे कृपाळू सज्जन संतांनो पांडुरंगाला माझी आठवण करून द्या आणि माझी कीव-काकुलतीही सांगा. मी अनाथ, अपराधी, पतीत आहे. पण तरीसुद्धा आपल्या पायावेगळा करू नका, अशी माझी विनंती सांगा. संतांनो, एवढे कृपादान मला आपण द्या!

"माझ्या विठ्ठलाला म्हणावे, तुझी कृपा झाली तर मी धावून येईन. तिथं संतांच्या गाठीभेटी होतील आणि मग आम्ही आनंदानं वाळवंटी नाचत राहू."

*"तुम्ही संतजनीं।*
*माझी करावी विनवणी॥*
*काय तुक्याचा अन्याय।*
*त्यासी अंतरले पाय॥*
*भाका बहुतां रीती।*
*माझी कीव काकुलती॥*
*न देखे पंढरी।*
*तुका चरण विटेवरी॥"*

तुकोबा मग पंढरीहून विठ्ठलाचा काय निरोप येतो आहे,

याची मार्गप्रतिक्षा करीत अधीर होऊन बसले होते. ते इतके अधीर झाले होते की, त्यांची झोप उडाली होती. एक एक दिवस ते मोजीत होते. त्यांना धीर उरला नव्हता. जीव कासावीस होत होता. या काळातील तुकोबांच्या मनाची अवस्था त्यांच्या अभंगातूनच उमटलेली आहे :

*आतां माझे सखे येती वारकरी।*
*जीवा आस थोरी लागली ते॥*
*सांगतील माझ्या निरोपाची मात।*
*सकळ वृत्तांत माहेरींचा॥*
*काय लाभ जाला काय होते केणें।*
*काय काय कोणें सांटविलें॥*
*मागणें तें काय धाडिलें भातुकें।*
*पुसेन तें सुखें आहेतसीं॥*
*तुका म्हणे काय सांगती ते कानीं।*
*ऐकोनियां मनी धरुनी राहें॥*

शेवटी पंढरीहून वारकरी देहूला परतले. तुकोबांना अपार आनंद झाला. त्यांच्याशी त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्यावरही त्यांनी अभंग रचलेले आहेत. वारकऱ्यांना भेटताच त्यांनी म्हटले आहे :

*आजि दिवस धन्य।*
*तुमचे जाले दरुषण॥*
*सांगा माहेरींची मात।*
*अवघा विस्तारीं वृत्तांत॥*

*आइकतो मन।*
*करुनि सादर श्रवण॥*
*तुका म्हणे नाम।*
*माझा सकळ संभ्रम॥*

*बोलिलीं तीं काय।*
*माझा बाप आणि माय॥*
*ऐसे सांगा जी झडकरी।*
*तुम्ही सखे वारकरी॥*
*पत्राचें वचन।*
*काय दिलें फिरावून॥*
*तुका म्हणे कांहीं।*
*मना आणिलें की नाही॥*

*काय पाठविले।*
*सांगा भातुकें विठ्ठलें॥*
*आसे लागलासे जीव।*
*काय केली माझी कींव॥*
*फेडिलें मुडतर।*
*किंवा काही जरजर॥*
*तुका म्हणे सांगा।*
*कैसे आर्त पांडुरंगा॥*

सगळ्याच संतांनी देवाशी सख्य जोडलेले होते; परंतु तुकोबांनी ज्या आर्त भावनेने देवाचे मानवीकरण केलेले आहे, ते फार आगळेवेगळे आणि लोभस आहे!

# शब्दें वाटू धन –

तुकोबांनी नामदेव – ज्ञानदेवांनी संस्थापिलेला भागवत-धर्म मोठ्या प्रभावीपणानं उजळत ठेवला. जनसामान्यांपर्यंत गाजत-गर्जत ठेवला. ज्ञानदेवांच्या भागवत-धर्मात कसलाच भेदभाव नव्हता. तुकोबांनी देखील 'जाळीन मी भेद, येथं प्रमाण तो वेद!' असा पुकारा करून सर्वांगीण समतेचा ध्वज उंच फडकत ठेवला. त्यांनी अवघ्यांना हाक देऊन म्हटले :

*या रे नाचों अवघेजण।*
*भावें प्रेमें परिपूर्ण॥*
*गाऊ पंढरीचा राणा।*
*क्षेम देउनि संतजना॥*
*सुख साधु सुखासाठीं।*
*नाम हरिनाम बोभाटीं॥*
*प्रेमा वांटितो उदार।*
*देतां नाहीं सानाथोर॥*
*पापे पळालीं बापुडीं।*
*काळ झाला देशधडी॥*
*तुका म्हणे धन्य काळ।*
*आजि प्रेमाचा सुकाळ॥*

अशी निर्मळ समवृत्ती तुकोबांची होती. तरी एकदा तुकोबा शेतावरून चालले असताना तिथे दाणे टिपीत असलेले पक्षी

त्यांना पाहून उडून गेले. तुकोबा फार फार खंतावले. त्यांना वाटले, ज्याअर्थी या पक्षांना माझी भीती वाटली, त्याअर्थी माझ्या अंतःकरणातला द्वैतभाव पूर्णपणाने निमालेला नाही. तो पूर्णपणे मावळला पाहिजे आणि आपल्याविषयी सगळ्यांना प्रेममय निर्भयता वाटली पाहिजे. ज्ञानेश्वरांप्रमाणेच 'जो सर्वां भूतांचे ठायी। द्वेषाते नेणेचि काही। आप-परु नाही। चैतन्या जैसे॥' अशी चित्ताची साम्यावस्था लाभावी, अशी त्यांची आकांक्षा होती. ती एका अभंगात प्रकट केलेली आहे :

*अवघीं भूतें साम्या आलीं।*
*देखिलीं म्यां कैं होतीं॥*
*विश्वास तो खरा मग।*
*पांडुरंग कृपेचा॥*
*माझी कोणी न धरो शंका।*
*हो कां लोकां निर्द्वंद्व॥*
*तुका म्हणे जें जें भेटे।*
*तें तें वाटे मी ऐसे॥*

तुकोबांच्या दिंडीत सर्व तऱ्हेचे लोक सामील झालेले होते. त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, तरुण-वृद्ध असला कसलाच भेदभाव नव्हता. एकमेक एकमेकांना कीर्तनाच्या रंगात रंगून जाऊन उराउरी भेटत असत. नाचत असत, गात असत, चरणी लोटांगणही घेत असत. हरिनामाच्या गजरात देहभान विसरून जात असत. काम, क्रोध, लोभ, दंभ, मत्सर, गर्व इत्यादी विकारांबरोबरच जात-पात व गणगोत

इत्यादी भेदही मावळून जात असत. तुकोबांनीच या अनुपम आनंद-सोहळ्याचे फार सुरेख असे वर्णन एका अभंगात केलेले आहे :

*खेळ मांडियेला वाळवंटी घाई।*
*नाचती वैष्णव भाई रे॥*
*क्रोध अभिमान केला पावटणी।*
*एक एका लागतील पायीं रे॥*
*नाचती आनंदकल्लोळीं।*
*पवित्र गाणें नामावळी॥*
*कळिकाळावरि घातलीसे कास।*
*एक एकाहुनी बळी रे॥*
*गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा।*
*हार मिरवती गळा॥*
*टाळ मृदंग घाई पुष्पवरूषाव।*
*अनुपम्म सुखसोंहळा रे॥*
*लुब्धलीं नादीं लागली समाधी।*
*मूढ जन नर नारी लोकां॥*
*पंडित ज्ञानी योगी महानुभाव।*
*एकचि सिद्धसाधकां रे॥*
*वर्णाभिमान विसरली याति।*
*एकएकां लोटांगणी जाती॥*
*निर्मळ चित्तें जालीं नवनीतें।*
*पाषाणा पाझर सुटती रे॥*

*होतो जयजयकार गर्जत अंबर।*
*मातले हे वैष्णव वीर रे॥*
*तुका म्हणे सोपी केली पायवाट।*
*उतरावया भवसागर रे॥*

एकनाथांप्रमाणेच लोकजागृतीसाठी लोकरंजनातून लोकशिक्षण साधण्याचा प्रयत्न तुकोबांनी देखील केलेला होता. नाथांनी जशी भारूडे रचली, तशीच तुकोबांनी 'रूपके' लिहिली. 'चेंडूफळी' नामक रूपकात तुकोबा सांगतात :

*झेला रे झेला वरचेवर झेला।*
*हातिचें गमावी तो पाठीं साहे टोक॥*
*त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा।*
*वरिलिया मुखें मन लावी तेथे डोळा॥*

'विटीदांडू' नामक रूपकात ते सांगतात :

*सारा विटूदांडू।*
*आणीक काही खेळ मांडूं॥*
*बहु अंगा आले डाव।*
*स्थिर नाहीं कोठें पाव॥*
*कोली हाणे टोला।*
*झेली तेणे तो गोविला॥*

'फुगडी' नामक रूपकात तुकोबा लिहितात :

*फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे।*
*लाज सांडोनि एक एकी पाहे॥*

*फुगडी गें अवघें मोडी गे।*
*तरीच गोडी गे संसार तोडी गे॥*
*मागें जें शिकली होतीस पोटीं।*
*तें चि विचारूनि आतां उच्चारी ओठीं।*
*त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं।*
*सावरूनि धरी घाली मूळबंदी गांठी॥*

अशा खेळांवरील रूपकांप्रमाणेच तुकोबांनी घोंगडी, वासुदेव, वाघ्या, पांगूळ, जोशी, दरवेस, तसेच सौऱ्या, विराण्या, गोंधळ, लळीत, पाळणा इत्यादींवरही सुरेख रूपके रचलेली आहेत.

'कांडण' नामक रूपकही तुकोबांनी लिहिले आहे. त्यांचे हे कांडण मात्र असे आहे :

*सावडीं कांडण ओवी नारायण।*
*निवडे आपण भूस सार॥*
*मुसळ आधारीं आवरूनि धरीं।*
*सांवरोनि थिरीं घाव घालीं॥*
*वाजती कांकणें अनुहात गजरें।*
*छंद माहियेरे गाऊं गीति॥*
*कांडितां कांडण नव्हे भाग शीण।*
*तुजमजपण निवडें तों॥*
*तुका म्हणे रूप उमटे आरिसा।*
*पाक त्या सरिसा शुद्ध जाला॥*

तुकोबांनी 'स्फुट-अभंग' तर हजारोंनी लिहिले आहेत.

त्याशिवाय श्लोक, भूपाळ्या, आरत्या, ओव्या इत्यादी प्रकारची रचनाही विपुल केलेली आहे.

तुकोबांनी कबीराप्रमाणे हिंदी भाषेत दोहरे व साक्या लिहिलेल्या आहेत. त्याचा हा एक नमुना :

*रामभजन सब सार मिठाई।*
*हरि संताप जनमदुख राई॥*
*दुधभात घृत सकरपारे।*
*हरते भुक नहि अंततारे॥*
*खावते जुग सब चलिजावे।*
*खटमिठा फिर पचतावे॥*
*कहे तुका रामरस जो पावे।*
*बहुरि फेरा वो कबहु न खावे॥*

तुकोबांचे जसे भाषाप्रभुत्व अपूर्व होते तशीच त्यांची शब्दसंपत्तीही अगाध होती. शब्दशक्तीचे भान त्यांना विलक्षण होते. एका अभंगात तर त्यांनी शब्दमहिमाच सांगितलेला आहे :

*आम्हां घरीं धन शब्दाचीं च रत्नें।*
*शब्दाचीं च शस्त्रे यत्न करूं॥*
*शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन।*
*शब्दें वांटूं धन जनलोकां॥*
*तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव।*
*शब्दें चि गौरव पूजा करूं॥*

++

# तुकोबा – शिवबा भेट

महाराष्ट्रात तो काळच सत्पुरुषांच्या उदयाचा असावा. तेराव्या शतकात नामदेव-ज्ञानदेव आदी थोर संतमंडळी होऊन गेली. त्यानंतर नाथ झाले. आणि मग सतराव्या शतकात राष्ट्रगुरु समर्थ रामदास, लोकात्मा तुकाराम आणि युगप्रवर्तक छत्रपती शिवाजीमहाराज हे तीन महापुरुष होऊन गेले. रामदास आणि तुकाराम हे संतसज्जनच होते. परंतु शिवाजीमहाराजसुद्धा वरवर जरी राजकारणी छत्रपती दिसले, तरी अंतःकरणातून ते धर्मरक्षक आणि अध्यात्म अनुसरणारेच होते. म्हणूनच त्यांच्या स्वराज्य संपादनाच्या कार्यात समर्थांनी त्यांना साहाय्य केले होते. शिवरायांनी त्यांना आपले गुरूच मानले होते.

राजकारणाच्या व्यापामुळे शिवबांना तुकोबांच्या दर्शनाला जरी लवकर जाता आले नव्हते, तरी तुकोबांची कीर्ति आणि वाणी त्यांच्या कानी सदैव येतच होती. शिवबांना मनातून वरचेवर असे वाटत होते की, एवढा मोठा संत-सत्पुरुष आपल्या राज्यात लोकजागृतीचे आणि धर्मरक्षणाचे कार्य करीत असताना आपणाला मात्र त्यांच्या दर्शनाचा लाभ अद्याप होत नाही, हे दुर्दैवच आहे. तुकोबांच्या दर्शनासाठी अनेकवेळा जाण्याचे त्यांनी ठरविले, पण दरवेळी काहीना काही महत्त्वाचे काम निघाल्यामुळे ठरविल्याप्रमाणे काही घडले नव्हंते.

एकदा शिवबांना वाटले की, तुकोबांचे दर्शन होईल तेव्हा

होवो, पण त्याआधी त्यांचा सन्मान तरी करावा! तुकोबांच्या साधुत्वाबरोबरच त्यांच्या बुडत्या प्रपंचाची वार्ताही शिवबांच्या कानी होतीच. म्हणून त्यांनी एके दिवशी पालखी, घोडा, छत्री, अब्दागीर आणि ताटभर सुवर्णमोहरा असा नजराणा आपल्या विश्वासू माणसांकरवी तुकोबांकडे धाडला.

तो नजराणा घेऊन शिवबांची मंडळी देहूत आली. तुकोबांच्या घराची चौकशी करू लागली. शिवबांकडून आलेली ती मंडळी पाहाताच त्यांच्याभोवती लोकांची ही गर्दी जमली! त्यातल्याच एकाने तुकोबांच्या घरी पळत पळत जाऊन सांगितले. तुकोबा त्यावेळी घरात नव्हते. जिजाबाईला त्या एकानं म्हटलं की, "मावशी, तुकोबाला पकडायला छत्रपतींचे लोक आले आहेत."

ते ऐकताच जिजाबाई कडाडली, "पकडायला? कशापायी? त्यांनी काय चोरी केली का दरोडा घातला?"

एवढ्यात शिवबांची ती मंडळी तपास काढीत तुकोबांच्या दारातच येऊन ठेपली. त्यांना बघताच जिजाबाईनं त्यांच्यावरही हल्ला चढवला. म्हणाली, "माझ्या मालकाला पकडायला आलात व्हय ? काय केलंय त्यांनी ? त्यांच्यासारखा साधूपुरुष या देहूगावात नाही. ते कोणाच्या अध्यात का मध्यात? मग कशापायी त्यांना पकडताय?"

जिजाबाईची ही सरबत्ती ऐकून शिवबांची मंडळी हसू लागली. त्यातला प्रमुख हसू आवरून पुढं झाला आणि म्हणाला, "आई, आम्ही तुकोबांना पकडायला आलो नाहीत."

"मग?"

"छत्रपती शिवाजीमहाराजांनी महाराजांच्या सन्मानासाठी नजराणा देऊन मुद्दाम आम्हाला पाठविलेलं आहे."

"नजराणा!"

"होय. ही पालखी, हा घोडा, ही छत्री, हे अब्दागीर आणि ह्या ताटभर सोन्याच्या मोहरा!"

हे सगळं वैभव पाहाताच जिजाबाईचा राग कुठच्या कुठे पळाला. तिनं त्या मंडळींचं स्वागत केलं. घरात नेऊन घोंगडीवर बसवलं.

तेवढ्यात तुकोबा आले. दारात पालखी, घोडा, छत्री, अब्दागीर हे सगळं पाहून त्यांना नवलच वाटलं. घरात गेले तर ताटभर मोहरा दिसल्या! ते आणखी चकित झाले!

तुकोबांना पाहाताच मंडळींनी उठून अदबीनं नमस्कार केला आणि शिवबांचा निरोप त्यांच्या कानी घातला. शिवबांनी नजराणा पाठवताना त्या मंडळींबरोबरच तुकोबांना आपल्याकडं येण्यासाठी निमंत्रणही दिलं होतं.

तुकोबांनी ते सगळं पाहिलं, ऐकलं, आणि त्या मंडळींना नम्रपणानं ते म्हणाले, "तुमच्या राजाला माझा नमस्कार सांगा आणि हा सगळा नजराणा परत घेऊन चला! माझ्यासारख्याला याचा काय उपयोग?"

तुकोबांचे हे शब्द ऐकताच जिजाबाईला राग आला. ती तुकोबांना म्हणाली, "अहो, राजानं पाठविलंय ते परत करू नका. तुम्हाला नको असल तर राहू द्या, पण आम्हाला सुखानं चार घास खाऊ द्या."

तुकोबा हसले आणि म्हणाले, "आवले, अग हे वैभव

आपल्या उपयोगाचं नाही. पांडुरंग देईल ती मीठभाकरी बरी. मंडळी, घेऊन जा हा नजराणा."

शिवबाची मंडळी तुकोबांची निरिच्छवृत्ती पाहून भारावून गेली.

तुकोबांनी मग विठ्ठलालाच म्हटले, "देवा असल्या मोहात मला कशासाठी पाडता? अहो, हे वैभव म्हणजे विष्टेप्रमाणेच आहे. देवा, मला जे आवडत नाही ते कशासाठी पुरवता? मला एकांतप्रिय असताना ह्या मोहाची संगत कशासाठी मागे लावता? हे शरीर, द्रव्य, गर्दी हे सगळं मला ओकारीसारखंच आहे. देवा, या मोहातून सोडवा. हे तुमच्याच हाती आहे :

*दिवट्या छत्री घोडे।*
*हे तो बऱ्यांत न पडे॥*
*आता येथें पंढरिराया।*
*मज गोविसी कासया॥*
*मान दंभ चेष्टा।*
*हे तो शूकराची विष्टा॥*
*तुका म्हणे देवा।*
*माझे सोडवणें धावा॥*

*नावडे जें चित्ता।*
*तें चि होसी पुरविता॥*
*कां रे पुरविली पाठी।*
*माझी केली जीवेसाटीं॥*
*न करावा संग।*

*वाटे दुरावावें जग ॥*
*सेवावा एकांत।*
*वाटे न बोलावी मात ॥*
*जन धन तन।*
*वाटे लेखावें वमन ॥*
*तुका म्हणे सत्ता।*
*हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥*

तुकोबांनी नजराणा परत करताना छत्रपती शिवरायांना जे उत्तर लिहिले तेही मोठे मार्मिक आहे. त्यातून तुकोबांची साधूवृत्ती दिसून येते. तुकोबांनी या अभंगात लिहिले आहे, "आपण थोर छत्रपती. आम्ही अरण्यवासी. आमचे दर्शन म्हणजे हीन – अमंगळाचे दर्शन. फाटक्या चिंध्यातले आमचे मळलेले शरीर. हातपाय म्हणजे कळाहीन काड्याच. असे आम्ही. म्हणून आमच्या भेटीची इच्छा धरू नका, अशी विनंती आहे. आमचा पालनकर्ता पांडुरंग आहे. तुमच्यापाशी येऊन आम्ही काय मागावे? चालण्याचा व्यर्थ शीण मात्र होईल." तुकोबा आपल्या अभंगवाणीनं म्हणतात :

*विरंचीनें केलें ब्रम्हांड सकळ।*
*तयामाजी खेळ नाना युक्ती ॥*
*युक्तीचा बाळक ब्रम्हनिष्ठ ज्ञानी।*
*गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥*
*ऐसा तुझा प्रेमळ कळे कांहीं एक।*
*पाहूनियां लेख पत्रिकींचे ॥*

*शिव तुझें नाम ठेविलें पवित्र।*
*छत्रपति सूत्र विश्वाचें कीं॥*
*व्रत नेम तप ध्यानयोग कळा।*
*करूनि मोकळा जालासी तूं॥*
*होता लागला आमुचिये भेटी।*
*पत्रामाजी गोष्टी हे चि थोर॥*
*याचें हे उत्तर ऐक गा भूपती।*
*लिहिली विनंती हेताची हे॥*
*अरण्यावासी आम्ही फिरो उदासीन।*
*दर्शन ही हीन अमंगळ॥*
*वस्त्राविण काया जालीसे मळीन।*
*अन्नरहित हीन फळाहारी॥*
*रोडके हात पाय दिसे अवकळा।*
*काय तो सोहळा दर्शनाचा॥*
*तुका म्हणे माझी विनंती सलगीची।*
*वार्ता हे भेटीची करूं नका॥*
*तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय।*
*वृथा सीण आहे चालण्याचा॥*
*मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर।*
*वस्त्रासी हे थार चिंध्या बिदी॥*
*निद्रेसी आसन उत्तम पाषाण।*
*वरी आवरण आकाशाचें॥*
*तेणें काय करणें कवणाची आस।*
*वायां होय नाश आयुष्याचा॥*

*राजगृहा यावें मानाचिये आसे।*
*तेथे काय वसे समाधान॥*
*रायाचिये घरी भाग्यवंता मान।*
*इतरां सामान्यां मान नाहीं॥*
*देखोनियां वस्त्रे भूषणांचे जन।*
*तात्काळ मरण येतें मज॥*
*ऐकोनियां मानाल उदासता जरी।*
*तरी आम्हां हरि उपेक्षीना॥*
*आतां हें चि तुम्हां सांगणें कौतुक।*
*भिक्षे ऐसें सुख नाही नाहीं॥*
*तपव्रतयाग महां भले जन।*
*आशाबद्ध हीन वर्तताती॥*
*तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे।*
*पूर्वी च दैवांचे हरिभंक्त॥*

**तुकोबांनी शिवरायांना उपदेशात्मक असे चार शब्दही लिहिलेले** आहेत :

*आता एक योग साधावा हा नीट।*
*भल्याचा तो वीट मानूं नये॥*
*जेणे योगे तुम्हा घडों पाहे दोष।*
*ऐसा हा सायास करूं नये॥*
*निंदक दुर्जन संग्रहीं असती।*
*त्यांची युक्ती चित्तीं आणूं नका॥*
*परीक्षावे कोण राज्याचे रक्षक।*

*विवेकाविवेक पाहोनियां ॥*
*सांगणे न लगे सर्वज्ञ तूं राजा।*
*अनाथांच्या काजा साह्य व्हावे ॥*
*हें चि ऐकोनियां चित्त समाधान।*
*आणीक दर्शनें चाड नाहीं ॥*
*घेऊनियां भेटी कोण हा संतोष।*
*आयुष्याचे दिस गेले गेले ॥*
*एकदोनी कर्मे जाणोनियां वर्में।*
*आपुलिया श्रमें राहूं आतां ॥*
*कल्याणकारक अर्थ याचा एक।*
*सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥*
*आत्मारामीं मन ठेवूनियां राहे।*
*रामदासीं पाहें आपणेयां ॥*
*तुका म्हणे राया धन्य जन्म क्षिती।*
*त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥*

तुकोबांच्याकडून परत आलेला नजराणा आणि पत्र पाहून शिवबांच्या मनी तुकोबांच्याविषयी आणखीनच परम आदराची भावना निर्माण झाली. तुकोबांचं श्रेष्ठत्व आणखीनच त्यांच्या ध्यानी आले. तुकोबांच्या भेटीची शिवबांना आणखीच उत्कंठा लागून राहिली.

एकदा मात्र भेटीचा योग घडून आला. पुण्याजवळ लोहगावी तुकोबांचं त्यादिवशी कीर्तन होतं. शिवबांना ही वार्ता कळली. ते जवळपासच होते. म्हणून त्यांनी ही पर्वणी साधायची असे

ठरविले आणि ते लोहगावी आले. तुकोबांच्या चरणी मस्तक ठेवले. तुकोबांना डोळांभरून पाहिले. तुकोबांनी शिवबांना जवळ घेऊन कुशल पुशिले. शिवबा तुकोबांच्या सान्निध्यात राहिले. रात्रीच्या कीर्तनातही रंगून गेले.

शिवबांच्या पाळतीवर असलेल्या चाकणच्या अंमलदाराला शिवबा लोहगावी आहेत; ही वार्ता जेव्हा कळली, तेव्हा त्या यवन अधिकाऱ्याने पठाणांची एक फौजच लोहगावी शिवबांना पकडण्यासाठी पाठविली.

पठाणांची फौज लोहगावी पोचली. त्यावेळी विठोबाच्या देवळातील कीर्तन रंगात आलेले होते. पठाणांनी देवळालाच वेढा घातला.

वेढ्याची वार्ता शिवबांना कळताच त्यांनी तुकोबांच्याकडे पाहिले. तुकोबांनी प्रसंग ओळखला आणि समोरच्या विठ्ठलालाच त्यांनी साकडे घातले.

*काय ऐसी वेळ।*
*वोडवली अमंगळ॥*
*आजि दुखवलें मन।*
*कथाकाळीं जाला सीण॥*
*पापाचिया गुणें।*
*त्यांचिया वेळे दर्पणे॥*
*तुका म्हणे कानीं।*
*घालूं आले दुष्टवाणी॥*
*न देखवे डोळां ऐसा हा आकांत।*

*परपीडे चित्त दुःखी होते॥*
*काय तुम्ही येथें नसालसें जालें।*
*आम्ही न देखिले पाहिजे हें॥*
*परचक्र कोठें हरिदासांच्या वासें।*
*न देखिजेत देशें राहातिया॥*
*तुका म्हणे माझी लाजविली सेवा।*
*हीनपणें देवा जिणें जालें॥*

तुकोबांचे हे साकडे देवालाही सोडवावे लागलेच. आख्यायिका अशी आहे की, तुकोबांनी अशी आळवणी सुरू केली त्याच वेळी देवळातून एक शिवाजीमहाराजांसारखा दिसणारा माणूस बाहेर पडला. पठाणांना वाटले तेच शिवाजीमहाराज! म्हणून ते त्यांना पकडायला धावले. तो त्यांना एकाऐवजी अनेक शिवाजी दिसू लागले. आणि एक एक पठाण एक एक शिवाजीच्या मागे धावू लागला.

परचक्र आले तसे गेले. शिवबा सुरक्षित राहिले. तुकोबांचा जीव भांड्यात पडला. त्यांनी विठ्ठलापुढे साष्टांग दंडवत घातला.

\+ +

# पैल आले हरि

तुकोबा देवाची भक्ती करत करत देवमय झाले होते. परब्रम्हस्वरूप बनले होते. या जगात ते देहाने वावरत होते, पण वृत्तीने ते केव्हाच या जगाच्या सीमा ओलांडून पार गेले होते.

आनंदाच्या एका आगळ्या वेगळ्या सरोवरात ते डुंबत होते. ह्या असल्या आनंदाचा अनुभव तुकोबांसारख्या साधकांशिवाय अन्य कोणाला कल्पनेतही मिळणे अशक्य आहे. तुकोबांनी ह्या आनंदाचे वर्णन मोठ्या आनंदाने केलेले आहे :

*आनंदाचे डोहीं आनंदतरंग।*
*आनंद चि अंग आनंदाचें॥*
*काय सांगो जालें कांहीचियाबाही।*
*पुढें चाली नाहीं आवडीनें॥*
*गर्भाचे आवडी मातेचा डोहळा।*
*तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे॥*
*तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा।*
*अनुभव सरिसा मुखा आला॥*

तुकोबा मृत्युकडे सुद्धा तो आनंदरूपच आहे अशा दृष्टीने पाहात होते. एका अभंगात त्यांनी अंतीचा हा आनंद-सोहळा वर्णिलेला आहे :

*आपुलें मरण पाहिलें म्या डोळां।*
*जो जाला सोहळा अनुपम्य॥*
*आनंदे दाटलीं तिन्ही त्रिभुवनें।*
*सर्वात्मकपणें भोग जाला॥*
*एकदेशीं होतों अहंकारें आथिला।*
*त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा॥*
*फिटले सुतक जन्ममरणाचें।*
*मी माझ्या संकोचें दुरी जालों॥*

*नारायणें दिला वसतीस ठाव।*
*ठेवूनियां भाव ठेलों पायीं।।*
*तुका म्हणे दिलें उमटुनि जगीं।*
*घेतलें ते अंगीं लावूनियां।।*

तुकोबांच्यासारखे साधक, खरेतर, या जगाचे रहिवासी नसतातच. त्यांचा निवास देवाच्या ठायीच असतो. या जगात ते केवळ परम करुणेमुळेच येत असतात आणि चुकलेल्या जगाला वाट दाखविण्याचे काम करीत असतात. साधना मार्गात काय किंवा ज्ञानमार्गात काय, दंभाचे कुरण उदंड माजलेले असते. ते नष्ट करून सत्याचा सन्मार्ग दाखवण्याचे कार्य खऱ्या साधकांना करावे लागते. तुकोबांच्यासारखा साधक मोठ्या आत्मविश्वासाने भक्तीचा डांगोरा पिटून कळीकाळालाही हादरून टाकतो. हेच त्यांचे खरेखुरे जीवनकार्य असते. एका अभंगात तुकोबा सांगतात :

*आम्ही वैकुंठवासी।*
*आलों या चि कारणासी।।*
*बोलिलो जे ऋषि।*
*साच भावें वर्ताविया।।*
*सांडूं संतांचे मारग।*
*आडरानें भरलें जग।।*
*उच्छिष्टाचा भाग।*
*शेष उरले तें सेवूं।।*
*अर्थे लोपलीं पुराणें।*

*नाश केला शब्दज्ञानें॥*
*विषयलोभी मन।*
*साधने बुडविलीं॥*
*पिटूं भक्तीचा डांगोरा।*
*कळिकाळासी दरारा॥*
*तुका म्हणे करा।*
*जयजयकार आनंदे॥*

तुकोबांना आपले अवतारकार्य आता संपले आहे, याची जाण झाली होती. त्यांना हेही कळून चुकले होते की, जन्ममरणाच्या फेऱ्यातून आता आपली सुटका होण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. परमसुखाच्या व आनंदाच्या माहेराला जाण्यासाठी त्यांचा जीव तळमळू लागला होता. या जगाच्या सासुरवासातून सुटण्यासाठी ते अधीर बनले होते. आपल्या मनाची ही अवस्था तुकोबांनी एका अभंगात फार उत्तमरीतीने सांगितलेली आहे :

*कन्या सासुऱ्यासि जाये।*
*मागे परतोनी पाहे॥*
*तैसें जालें माझ्या जिवा।*
*केव्हां भेटसी केशवा॥*
*चुकलिया माये।*
*बाळ हुरू हुरू पाहे॥*
*जीवना वेगळी मासोळी।*
*तैसा तुका तळमळी॥*

तुकोबांना त्या परम माहेराची इतकी ओढ लागली होती की, इथली सगळी आवराआवर करून ते तिकडेच डोळा लावून बसले होते. माहेरचा निरोप आला असून तिकडे न्यायला माहेरचे मूळ लवकरच येणार अशी त्यांची खात्रीही पटलेली होती. तुकोबा म्हणतात :

*आपुल्या माहेरा जाईन मी आतां।*
*निरोप या संतां हातीं आला॥*
*सुख दुःख माझें ऐकिलें कानीं।*
*कळवळा मनीं करूणेचा॥*
*करूनी सिद्ध मूळ साउलें भातुकें।*
*येती दिसें एकें न्यावयासी॥*
*त्या चि पंथें माझें लागलेंसे चित्त।*
*वाट पाहे नित्य माहेराची॥*
*तुका म्हणे आतां येतील न्यावया।*
*अंगे आपुलिया मायबाप॥*

तुकोबांनी घरच्या मंडळींचा निरोप घेतला. जिजाबाईला त्यांनी विचारलं, "आवले, येतीस का वैकुंठाला माझ्याबरोबर?" तुकोबांची भाषा त्या संसारी माणसांना कळली नाही. नेहमी ते असलंच काहीतरी बोलतात, अशी त्यांची समजूत झालेली! म्हणून जिजाबाई त्यांना म्हणाली, "तुम्हीच जा! मला सवड नाही यायला. माझी मंगळाई व्यायला झाली आहे. तिचं कोण करणार? . . ."

तुकोबांनी मग आपल्या दिंडीतल्या सगळ्या सोबत्यांचाही

निरोप घेतला. म्हणाले, "गड्यांनो, चुकलो माकलो असेन, त्याची क्षमा करा. दयालोभ कायम ठेवा. सत्कर्म करीत राहा. सत्धर्म आचरीत राहा. मला आता सर्वजण प्रेमाने निरोप द्या :

*सकळ ही माझी बोळवण करा।*
*परतोनि घरा जावें तुम्हीं॥*
*कर्मधर्में तुम्हां असावें कल्याण।*
*घ्या माझें वचन आशीर्वाद॥*
*वाढवूनि दिलों एकाचिये हातीं।*
*सकळ निश्चिंती जाली तेथें॥*
*आता मज जाणे प्राणेश्वरासवें।*
*माझिया भावें अनुसरलों॥*
*वाढवितां लोभ होईल उसीर।*
*अवघींच स्थिर करा ठायीं॥*
*धर्म अर्थ काम जाला एके ठायीं।*
*मेळविला जिंही हाता हात॥*
*तुका म्हणे आतां जाली हे चि भेटी।*
*उरल्या त्या गोष्टी बोलावया॥*

तुकोबांना आंता माहेराला नेण्यासाठी पैलतीरावर प्रत्यक्ष पांडुरंगच अवतरला आहे, असा भास होऊ लागला. पंढरीचा राणा त्यांना सगळीकडं दिसू लागला. त्याच्या खुणा जाणवू लागल्या. वैष्णवांचा मेळा हरिनामाचा गजर करीत आहे, टाळमृदंगाचा झणत्कार गगनाला भिडला आहे, असे दृश्य त्यांना दिसू लागले. तुकोबा वर्णन करतात :

*पैल आले हरि।*
*शंख चक्र शोभे करीं॥*
*गरूड येतो फडत्कारें।*
*ना भी ना भी म्हणे त्वरे॥*
*मुगुटकुंडलांच्या दीप्ति।*
*तेजें लोपला गभस्ति॥*
*मेघश्यामवर्ण हरि।*
*मूर्ति डोळस साजिरी॥*
*चतुर्भुज वैजयंती।*
*गळां माळ हे रूळती॥*
*पीतांबर झळके कैसा।*
*उजळल्या दाही दिशा॥*
*तुका झालासे संतुष्ट।*
*घरा आले वैकुंठपीठ॥*

आणि शेवटी शके १५५१ मधील फाल्गुन वद्य द्वितीया – सोमवार हा दिवस उजाडला. तुकोबांनी या जगाचा निरोप घेतला.

*आम्ही जातों आपुल्या गांवा।*
*आमुचा रामराम घ्यावा।*
*तुमची आमची हे चि भेटी।*
*येथुनियां जन्मतुटी॥*
*आतां असों द्यावी दया।*
*तुमच्या लागतसें पायां॥*

*येतां निजधामीं कोणी।*
*विठ्ठल विठ्ठल बोला वाणी॥*
*रामकृष्ण मुखीं बोला।*
*तुका जातो वैकुंठाला॥*
*आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी।*
*सकळां सांगावी विनंती माझी॥*
*वाढवेळ जाला उभा पांडुरंग।*
*वैकुंठा श्रीरंग बोलावितो॥*
*अंतकाळीं विठो आम्हांसी पावला।*
*कुडीसहित जाला गुप्त तुका॥*

इ. स. १६०८ ते १६५० हा तुकोबांचा काळ. अवघ्या बेचाळीस वर्षांच्या आयुष्यात तुकोबांनी आपल्या अंगच्या उत्कट भक्तीने अमरपद मिळविले. ज्ञानेश्वरांबरोबरच तुकोबांचा जयघोष मराठी मन आणि माती मोठ्या भक्तीनं आणि आदरानं करू लागली.

'ज्ञानबा – तुकाराम' हा मराठी माणसाच्या अभिमानाचा मंत्रच बनला!

*संत कृपा झाली।*
*इमारत फळा आली॥*
*ज्ञानदेवें रचिला पाया।*
*तुका झालासे कळस॥*

BVBK-0402844